




सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026




❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२३९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २१ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



## संविधानातून 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवादी' शब्द काढले जाणार? सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नवी दिल्ली**

राज्यघटनेच्या प्रस्तावनेतून 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवादी' हे शब्द काढून टाकण्याची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात पुढील महिन्यात सुनावणी होणार आहे. सुरुवातीला न्यायालयाने याचिकांवर प्रश्न उपस्थित केले आणि हे शब्द संविधानाच्या मूळ आत्म्याला अनुसरून असल्याचे सांगितले. पण, न्यायालयाने पुढे १८ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात याचिकाकर्त्यांचे म्हणने सविस्तर ऐकणार असल्याचे सांगितले.

सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या ३ याचिकांमध्ये असे म्हटले आहे की, १९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरूस्तीद्वारे हे शब्द प्रस्तावनेमध्ये जोडण्यात आले होते. तेव्हा आणीबाणी होती आणि बहुतांश विरोधी पक्षाचे नेते तुरुंगात होते. कोणतीही चर्चा न करता राजकीय कारणासाठी हे शब्द प्रस्तावनेत घालण्यात आल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा आहे.

याचिकाकर्ते बलराम सिंह यांचे वकील विष्णू जैन आणि याचिकाकर्ते अश्विनी उपाध्याय यांनी म्हटले की, संविधान सभेने मोठ्या चर्चेनंतर 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द प्रस्तावनेत न घेण्याचा निर्णय घेतला होता. यावर २ न्यायमूर्तींच्या खंडपीठाचे अध्यक्ष असलेले न्यायमूर्ती संजीव खन्ना म्हणाले – भारताने धर्मनिरपेक्ष राहावे असे तुम्हाला वाटत नाही का? भारतातील धर्मनिरपेक्षता ही फ्रान्समधील प्रचलित संकल्पनेपेक्षा वेगळी आहे. संविधान सभेत चर्चा होत असताना, तेव्हाची धर्मनिरपेक्षता विदेशी विचाराबाबत होती. धर्मनिरपेक्षता भारतात वेगळ्या स्वरूपात आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयानेही अनेक निर्णयांमध्ये धर्मनिरपेक्षता हा संविधानाचा अविभाज्य भाग असल्याचे म्हटले आहे.



### सुब्रमण्यम स्वामी यांनीही आपले मत मांडले

यावर तिसरे याचिकाकर्ते सुब्रमण्यम स्वामी म्हणाले की, न्यायालयाने या प्रकरणाची सविस्तर सुनावणी करावी. हे लक्षात घ्यावे की, प्रस्तावना संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारली होती, परंतु ती १९७६ मध्ये बदलली गेली. या दुरुस्तीनंतरही २६ नोव्हेंबर १९४९ रोजी ती मान्य झाल्याचे प्रस्तावनेत लिहिले आहे. जुनी तारीख कायम ठेवताना नवीन गोष्टी जोडण्याचा विचार करण्याची गरज असल्याचे न्यायाधीशांनी मान्य केले.

### 'समाजवाद' शब्दाबाबत वकिलांचा युक्तिवाद

'समाजवाद' ही एक प्रकारची राजकीय विचारधारा असल्याचा मुद्दाही सुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात आला. प्रत्येक पक्षाचा नेता लोकप्रतिनिधी झाल्यानंतर राज्यघटनेची शपथ घेतो. प्रत्येक विचारसरणीच्या लोकांना समाजवादी होण्याची शपथ घ्यायला लावणे चुकीचे आहे. यावर न्यायमूर्ती खन्ना म्हणाले की, 'समाजवाद' शब्दाला राजकारणाशी जोडण्याऐवजी हा समाजातील प्रत्येक घटकाला समान अधिकार देतो, असे पाहिले पाहिजे.

## कोणताही विभाग हा एका पक्षाचा नसतो; ठाकरे गट-काँग्रेस वादावर संजय राऊत स्पष्टच बोलले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

काँग्रेस पक्षाची केंद्रीय निवडणूक समितीची होणारी बैठक जागा वाटपाच्या निर्माण झालेल्या तिढ्यामुळे रद्द झाली. काँग्रेसचे जे नेते दिल्लीत पोहोचले आहेत, त्यांना दिल्लीतच थांबण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अन्य प्रमुख नेत्यांनाही दिल्लीत बोलावले आहे. या नेत्यांची पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या समवेत बैठक होणार आहे. जागावाटपावरून शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये बिघाडी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यातच आता पुन्हा एकदा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी यावर भाष्य केले.

पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्याची निवडणूक आहे. काँग्रेसचे पक्षश्रेष्ठी हे दिल्लीत आहेत. तिथे त्यांच्या बैठका होत असतात. त्यामुळे काँग्रेस नेते तिथे थांबले असतील तर काही चुकीचे वाटत नाही. कोणताही एक विभाग



असतो, तो एका पक्षाचा नसतो. एखाद्या भागावर एखाद्या पक्षाचा प्रभाव असू शकतो. कोकण-मुंबई, उत्तर महाराष्ट्रातील बऱ्याचशी भागात शिवसेनेचा प्रभाव आहे. विदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस नगण्य आहे. त्यामुळे विदर्भातील जागावाटपासंदर्भात त्यांच्यात आणि आमच्यात मतभेद किंवा संघर्ष होण्याचा प्रश्न येत नाही. एखादी किंवा दुसरी जागा सोडली, तर काँग्रेस आणि आमच्यातही मतभेद नाहीत.

## विधानसभा नाही, लोकसभेवेळच्या एकमेकांवरील परोपकारावरून ठाकरे-काँग्रेसचे जागावाटप अडले?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

महायुतीतून भाजपाची पहिली यादी आली तरी लोकसभेला आघाडी घेणाऱ्या मविआमध्ये जागावाटपावरून वाद इरेला पेटला आहे. एवढा की उद्धव ठाकरे महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतील अशीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. अशातच काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत रंगलेला विदर्भातील जागांचा वाद हा विधानसभेचा नाही तर लोकसभेला एकमेकांवर केलेल्या उपकारांमुळे रंगला असल्याचे वृत्त येत आहे.

काँग्रेसशी बिनसल्याने उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीस आणि राऊतांनी अमित शाह यांची भेट घेतल्याची चर्चा रंगली होती. ती अफवा असल्याचे शिवसेनेच्या एका वरिष्ठ नेत्याने एबीपी माझाला स्पष्ट केले आहे. तसेच या नेत्याने काँग्रेस आणि शिवसेनेत जागांवरून रंगलेल्या वादाचे कारणही सांगितले आहे.

काँग्रेस विदर्भात ठाकरे गटाला एकही जागा देण्यास तयार नाहीय. नाना पटोलेंचा शिवसेनेला जागा सोडण्यास विरोध आहे. शिवसेनेने विदर्भात तीन जागा मागितल्या आहेत. आम्हालाही पक्ष



वाढविण्यासाठी विदर्भात संधी मिळायला हवी अशी मागणी ठाकरे गटाची आहे. परंतू काँग्रेसच्या नेहमी लढविल्या जाणाऱ्या जागा सोडण्यास पटोले तयार नाहीत. ठाकरे गटाने लोकसभेला काँग्रेसला दोन जागा सोडल्या होत्या. रामटेकची सहा वेळा खासदार निवडून येत असलेली जागा काँग्रेसला सोडली, अमरावतीची सोडली. आता आम्हाला विधानसभेला तीन जागा सोडा, असा युक्तीवाद शिवसेनेने केला आहे, असे या वरिष्ठ नेत्याने म्हटले आहे. तर याला विरोध करत आम्ही लोकसभेला शिवसेनेला जास्त जागा दिल्या, यामुळे आता त्यांनी आम्हाला जास्त जागा द्याव्यात, असा युक्तीवाद काँग्रेसकडून केला जात आहे. लोकसभेला केलेले साटेलोटे विधानसभेच्या जागावाटपाआड आल्याने काँग्रेस आणि शिवसेनेतील जागांचा तिढा वाढला आहे. उद्धव ठाकरे स्वबळावर उतरतील अशी चर्चा सुरु झाली आहे. यावर आम्ही आघाडीतच राहणार, स्वबळाचा विचार नाही, असा दावाही या नेत्याने केला आहे.

## 'परिवर्तन महाशक्ती' कडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर, शिरोळ, मिरज स्वाभिमानीसाठी

## अचलपूर मधून बच्चू कडू निवडणुकीच्या रिंगणात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१कोल्हापूर**

राज्यात विधानसभा निवडणुकाची घोषणा झाली असून सध्या अनेक राजकीय घडामोडी घडताना दिसत आहे. यातच भाजपकडून २० ऑक्टोबर रोजी १०० उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. तर येत्या काही दिवसात महाविकास आघाडीकडून देखील उमेदवारांची यादी जाहीर होणार आहे.

यावेळी महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये मुख्य लढत पाहायला मिळणार आहे.



त्यामुळे कोणता पक्ष कोणत्या मतदारसंघात उमेदवार देणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. यातच परिवर्तन महाशक्तीने देखील विधानसभा निवडणुकीसाठी १० उमेदवारांची आपली पहिली यादी जाहीर केली आहे.

छत्रपती संभाजीराजे प्रमुख, महाराष्ट्र स्वराज्य पक्ष), बच्चू कडू (अध्यक्ष, प्रहार जनशक्ती पक्ष) आणि राजू शेट्टी (संस्थापक, स्वाभिमानी शेतकरी संघटना) यांनी एकत्र पत्रकार परिषद घेत परिवर्तन महाशक्तीच्या १० उमेदवारांची घोषणा केली आहे. या दहा उमेदवारांमध्ये बच्चू कडू यांच्या नावाचा देखील समावेश आहे. त्यांना अचलपूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे.

अनिल चौधरी यांना रावेरमधून संधी देण्यात आली आहे. तर गणेश निबाळकर यांना चांदवड विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तसेच वामनराव चटप यांना राजुरा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे तर अंकुश कदम यांना ऐरोली आणि सुभाष साबणे यांना देंगलुर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

तसेच गोविंदराव भवर यांना हिंगोली विधानसभा मतरदारसंघातून आणि माधव देवसरकर यांना हदगाव हिमायतनगर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे तर शिरोळ, मिरज या दोन मतदारसंघात स्वाभिमानी उमेदवार उद्या जाहीर करेल अशी माहिती राजू शेट्टी यांनी दिली.

यावेळी बारामतीमध्ये देखील परिवर्तन महाशक्ती उमेदवार देणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनाचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी दिली. त्यामुळे आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात परिवर्तन महाशक्ती कोणता उमेदवार उतरवणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## भाजपचे १६ विद्यमान आमदार वेटिंगवर! ७९ आमदारांना पुन्हा संधी, एका आमदाराचा पत्ता कट

### पहिल्या यादीत स्थान नसल्याने तिकीट कापले जाण्याची भीती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

भाजपने रविवारी जाहीर केलेल्या पहिल्या उमेदवार यादीत विद्यमान १६ आमदारांच्या मतदारसंघात उमेदवारी जाहीर न करता या आमदारांना वेटिंगवर ठेवले आहे. त्यामुळे आपले तिकीट कापले जाणार अशी भीती या आमदारांना आहे. यात काही आमदारांना मतदारसंघातून विरोध होत असल्याने तर काही ठिकाणी आमदारांची कामगिरी सुमार असल्याने त्यांना वेटिंगवर ठेवण्यात आले आहे. विद्यमान ७९ आमदारांना भाजपने पहिल्या यादीत स्थान दिले असून एका विद्यमान आमदाराचा पत्ता कट करण्यात आला आहे. तर ४ विद्यमान आमदारांऐवजी त्यांच्या नातेवाईकांना उमेदवारी देण्यात आली आहे.

नागपूर मध्य मतदारसंघातील आमदार विकास कुंभारे यांची उमेदवारी जाहीर केलेली नाही. या मतदारसंघात हलबा मतदारांचे वर्चस्व असून इथून हलबा



समाजाचे असलेले विधानपरिषद आमदार प्रवीण दटके इच्छुक आहेत. आर्वीचे आमदार दादाराव केचे यांचे नावही यादीत नसून या मतदारसंघात देवेंद्र फडणवीस यांचे पीए सुमीत वानखेडे हे मागील अनेक महिन्यांपासून तयारी आणि प्रचार करत आहेत.

गडचिरोलीचे आमदार डॉ. देवराव होळी यांच्या कामगिरीवर पक्षात नाराजी असून लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघात भाजप उमेदवाराला आघाडी मिळाली नव्हती. मूर्तिजापूरचे आमदार हरीश पिंपळे यांच्या कामगिरीबाबतही नाराजी असल्याने त्यांचेही नाव जाहीर करण्यात आलेले नाही. याशिवाय वाशिमचे लखन मलिक, उमरखेडचे नामदेव ससाणे यांचीही नावे पहिल्या यादीत नाहीत.

नाशिक मध्य मतदारसंघातही पक्षाने उमेदवार जाहीर केलेला नाही. इथे देवयानी फरांदे विद्यमान आमदार आहेत. माजी स्थायी समिती सभापती सुरेश अण्णा पाटील यांना उमेदवारी हवी आहे. लोकसभेत सोलापूर मतदारसंघातून पराभूत झालेले विद्यमान आमदार राम सातपुते यांच्या उमेदवारीला स्थानिक पदाधिकारी विरोध करत आहेत. त्यामुळे त्यांचे नाव यादीत आलेले नाही. याशिवाय पुणे कॅन्टोन्मेंटचे आमदार सुनील कांबळे, गेवराई लक्ष्मण पवार, खडकवासला भीमराव तापकीर पेणचे रवीशेठ पाटील या आमदारांना कामगिरीच्या मुद्द्यावर वेटिंगवर ठेवण्यात आल्याचे समजते.

भाजपचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या पुण्यातील कसबा पेठ मतदारसंघात पोटनिवडणुकीत काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांनी बाजी मारली होती. भाजपने पहिल्या यादीत या मतदारसंघातही उमेदवार दिलेला नाही.

## हमीभाव ४८९२ तरी शेतकऱ्यांच्या पदरी ३८०० रुपये; उत्पादन खर्च निघणे कठीण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

केंद्र शासनाने २० टक्के आयात शुल्क लावल्यावर सोयाबीनसह सर्वच तेलांच्या दरात २० ते २५ रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे सोयाबीनची दरवाढ होईल, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. प्रत्यक्षात ४८९२ रुपये क्विंटल हमीभाव असताना मार्केटमध्ये सोयाबीनला ३८०० ते ४२०० रुपयांपर्यंत भाव मिळत असल्याने उत्पादन खर्च निघणे कठीण आहे.

बाजार समित्यांमध्ये या आठवड्यात नवीन सोयाबीनची आवक सुरू झाली आहे. सद्यस्थितीत १३ ते १४ हजार सोयाबीनच्या पोत्यांची आवक होत आहे. नाफेडमध्ये १२ टक्के आर्द्रतेचा निकष आहे व दोन महिने चुकारे मिळण्याची शक्यता नाही त्यामुळे दिवाळीच्या तोंडावर अडचणीत सापडलेले शेतकरी सोयाबीन विक्रीला आणत आहेत. व्यापाऱ्यांद्वारा सोयाबीनची मातीमोलभावाने खरेदी होत आहे.



सोयाबीनचा उत्पादन खर्च वाढला आहे. पेरणीपूर्व मशागत ते काढणीपर्यंत एकरी किमान २० हजार रुपयांचा खर्च येतो. यंदा उतारा घटल्याने शेतकऱ्यांच्या हाती पोतभर सोयाबीनही उरत नाही. सोयाबीनला वर्षभर हमीभाव मिळाला नाही. त्यामुळे खरिपात सर्वाधिक पेरा असलेले सोयाबीन संकटात आले आहे. सबब, शेतकरी हवालदिल झाला आहे.

**सोयाबीनचे बाजारभाव (रु/क्विं)**

| | |
|---|---|
| ०९ ऑक्टोबर | ३६०० ते ४२०० |
| ११ ऑक्टोबर | ३९५० ते ४३९९ |
| १४ ऑक्टोबर | ३८०० ते ४३२५ |
| २६ ऑक्टोबर | ३८०० ते ४३०० |
| १८ ऑक्टोबर | ३८०० ते ४११२ |

### दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांची कोंडी

आर्थिक अडचणीतील शेतकरी दिवाळीपूर्वी सोयाबीन विक्रीला आणत असताना व्यापाऱ्यांद्वारा शेतकऱ्यांची कोंडी करण्यात येत आहे. सोयाबीन साठवणुकीला पुरेशी जागा नाही, शेतमजुरांचे चुकारे राहिले आहेत. दहा दिवसांवर दिवाळीचा सण आलेला आहे.

## उमेदवार यादीपूर्वीच १७ जणांना राष्ट्रवादी अजित पवार गटाचे एबी फॉर्मचं वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ चे बिगुल वाजले आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीत भाजपने रविवारी ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या पाठोपाठ राष्ट्रवादी अजित पवार गट उमेदवारांची पहिली यादी आज सायंकाळी जाहीर करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पहिल्या यादीत ३२ ते ३५ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली जाऊ शकते. तर यादी जाहीर करण्यापूर्वीच अजित पवार उमेदवारी निश्चित असलेल्या आमदारांना देवगिरी बंगल्यावर एबी फॅार्मचे वाटप करत आहेत. त्यामुळे देवगिरी बंगल्यावर अजित पवार गटाच्या नेत्यांची मोठी गर्दी झाली असून आतापर्यंत १७ उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले आहे.

**यांना मिळाले तिकीट :** राजेश विटेकर, संजय बनसोडे, चेतन तुपे, सुनील टिंगरे, दिलीप वळसे पाटील, दौलत दरोडा, राजेश पाटील, दत्तात्रय भरणे, आशुतोष काळे, हिरामण खोसकर, नरहरी झिरवळ, छगन भुजबळ, भरत गावित, बाबासाहेब पाटील, अतुल बेनके

## संपादकीय ......

# महाराष्ट्राच्या राजकारणाचा फिरता रंगमंच!


१० वर्षांपूर्वी म्हणजे २०१४ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली. शिवसेना-भाजप युती तुटल्याची त्यांनी घोषणा केली. २५ वर्षांची युती तुटल्याने याचे मोठे राजकीय पडसाद उमटले होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला भरभरून मते आणि संपूर्ण बहुमत मिळाल्यानंतर भाजपने पहिला घाव लगेचच होणार्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने शिवसेनेवर घातला. त्यानंतर हृदयविकारावर मात करत उद्धव ठाकरे यांनी अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला आणि युतीत ५०-५२ जागा मिळवून देणार्या शिवसेनेला ६३ जागा मिळवून दिल्या. शिवसेनेसाठी ही खूप मोठी जमेची बाजू होती.

विधानसभा निवडणुकीत युती केलेल्या शिवसेनेने निकालानंतर भाजपशी युती तोडली. तसे जाहीर न करता थेट काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससमोर मैत्रीचा हात पुढे केला. असे करून भाजपने २०१४ मध्ये तोडलेल्या युतीचा वचपा काढला होता. त्यानंतर अनेक घडामोडी घडल्या आणि शिवसेनेवर मात करत भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसमधून अजित पवारांना अलगद बाजूला केले आणि २३ नोव्हेंबर २०१९ रोजी थेट पहाटे शपथविधीचा राजकीय धक्का देणारा मोठा 'कार्यक्रम' केला. मात्र, बहुमत सिद्ध करणे शक्य नसल्याने अवघ्या ७२ तासात देवेंद्र फडणवीस-अजित पवार यांचे सरकार अस्थिर झाले आणि महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांनी २८ नोव्हेंबर २०१९ रोजी शिवाजी पार्कवर शपथ घेतली. महाराष्ट्राच्या इतिहासातील हा खूप महत्त्वाचा दिवस होता. तारीख होती २० जून २०२२. विधान परिषदेसाठी मतदान सुरू होते. त्याच रात्री एकनाथ शिंदे काही आमदारांसोबत नॉटरिचेबल झाले. त्यानंतर एकनाथ शिंदे ४० आमदारांसह आधी सूरत नंतर गुवाहाटीला गेले. शिवसेनेत ऐतिहासिक बंड झाले. त्यानंतर जे घडले ते संपूर्ण देशाने पाहिले. सरकार अल्पमतात आल्याने उद्धव ठाकरे यांनी २९ जून २०२२ रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. पुढे दुसर्याच दिवशी म्हणजे ३० जून रोजी एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांना अनपेक्षितपणे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घ्यावी लागली. पुढे २ जुलै २०२३ रोजी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही आमदारांसह शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाले आणि सत्तेचा सारीपाट बदलत गेला.

हे सर्व सांगण्याचे कारण हेच आहे की, २०१९ ते २०२४ या कालावधीत महाराष्ट्रातील राजकारण अत्यंत वेगाने बदलत गेले आणि आपल्या सुसंस्कृत समजल्या राजकीय नेत्यांनी सत्तेसाठी कशा आणि किती कोलांटी उड्या मारल्या, हे जनतेसमोर आले. म्हणजे शिवसेना-भाजप हे दोन पक्ष एकत्र निवडणूक लढले आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर एकमेकांचे शत्रू बनले होते. तर ज्या काँग्रेस-राष्ट्रवादीविरोधात शिवसेना लढली त्यांना साथ देत महाविकास आघाडी नावाने सत्ता स्थापन केली. आजची स्थिती पाहिली तर फुटलेली शिवसेना आणि फुटलेली राष्ट्रवादी असे चार पक्ष झाले आहेत. दोन सत्तेसोबत आहेत तर दोन विरोधात आहेत. या बदललेल्या आणि बिघडलेल्या राजकीय परिस्थितीला जबाबदार कोण याचे सरळ साधे उत्तर म्हणजे सत्तेचा हव्यास! अजित पवार यांची मुख्यमंत्रीपदाची इच्छा लपून राहिलेली नाही, फडणवीसांनी उपमुख्यमंत्रीपदाची घेतलेली शपथ भाजपच्या नेत्यांनी मनावर दगड ठेवून मान्य केली आहे. त्यामुळेच २०२४ ची निवडणूक महायुतीमधून लढवत असले तरी २०२९ साठी भाजपने शतप्रतिशतसाठी तयारी सुरू केल्याने सर्वांचे सारे काही सत्तेसाठीच सुरू आहे. त्यामुळे उगाच ताकाला जाऊन भांडे लपवण्याचे राजकीय पक्षांनी कारण नाही.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आणि अजित पवार उपमुख्यमंत्री बनले. अडीच दिवसानंतर पहाटेचे सरकार जमिनीवर आले आणि त्यानंतर अवघ्या पाच दिवसांनी लगेचच दुसरा शपथविधी झाला. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. थोड्या दिवसांनी अजित पवारही सत्तेत सहभागी झाले आणि त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. पहिल्या सत्तांतरानंतर ३० जून २०२२ रोजी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. पुढे २ जुलै २०२३ रोजी अजित पवार यांची सत्तेत एन्ट्री झाली आणि त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. म्हणजेच २०१९ ते २०२४ या पाच वर्षांत महाराष्ट्राने देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे असे तीन मुख्यमंत्री पाहिले. तर याच कालावधीत अजित पवार यांनी तीनवेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. विशेष म्हणजे मुख्यमंत्री राहिलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले. म्हणूनच २०१९ च्या तुलनेत २०२४ ची विधानसभा निवडणूक अगदी वेगळी आहे. किंबहुना, ही निवडणूक भाजप, काँग्रेससह शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांच्या राज्यातील अस्तित्वाची असू शकेल. म्हणूनच विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा पक्ष बदलण्याचे वारे जोरात वाहत आहेत. एका पक्षातून दुसर्या पक्षात किंवा पुन्हा मूळ पक्षात इच्छुक येऊ लागले आहेत. पक्ष सोडणे ही आपली चूक होती, अशीही कबुली देऊ लागले आहेत. राज्यात कधी नव्हे एवढी विचित्र राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. यापूर्वी पुलोदचे सरकार आले होते.

# करडईची पेरणी करण्याचं नियोजन करताय मग कोणती पीक पद्धती वापराल



**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

करडई हे रब्बी हंगामातील प्रमुख तेलबिया पीक आहे. हे पीक कमी पाण्यात, कमी खर्चात येणारे तसेच अवर्षणाचा ताण सहन करणारे पीक होय. रब्बी हंगामात पाण्याचा ताण पडला तरी हे पीक काही प्रमाणात उत्पादन देऊन जाते.

कृषी विशेष

कारण या पिकाच्या मुळ्या जमिनीत १४० ते १५० सेंमी खोलवर जाऊन ओलावा शोषून घेतात. करडई पिकाची लागवड करत असताना लागवडीच्या पीक पद्धतींचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

करडई लागवडीच्या विविध पीक पद्धती

१) सलग पीक पद्धत

- काही भागात करडईची पेरणी ज्वारी पिकात पट्टे टाकून केली जाते. करडई व ज्वारी पिकाची पाण्याची गरज वेगवेगळी आहे.

- करडई पिकास वाढीच्या अवस्थेत पाणी जास्त लागते तर ज्वारी पिकास वाढीच्या व दाणे भरण्याच्या अवस्थेत पाण्याची गरज असते.

- पट्टा पेर पद्धतीत सुरवातीच्या काळात करडई पीक जमिनीतील ओलाव्याचा मोठ्या प्रमाणात वापर करते.

- त्यामुळे ज्वारीच्या फुलोऱ्याच्या अवस्थेत ओलावा कमी मिळतो आणि करडईच्या शेजारील ज्वारीच्या ओळीची वाढ कमी होते.

- पर्यायाने उत्पादनात घट येते. म्हणून करडईचे सलग पीक घ्यावे तसेच काढणीसाठी मजूर मिळत नाहीत म्हणून मशीनने काढणी करण्यासाठी सलग करडई पीक घ्यावे.

२) वार्षिक फेरपालट

रब्बी हंगामात करडई, ज्वारी, हरभरा अशी वार्षिक पिकपद्धती घेतल्यास चांगले उत्पादन मिळते. तसेच रोग आणि किडीचा प्रादुर्भाव कमी दिसून येतो. जमिनीचा पोत टिकून राहतो.

३) खरीप रब्बी पीक पद्धत

खरीप हंगामात वेळेवर पाऊस पडल्यास भारी जमिनीत कमी कालावधीचे मूग किंवा उडीद हे कडधान्याचे पीक घेऊन रब्बी हंगामात करडई हे पीक घ्यावे.

४) आंतरपीक पद्धती

- आंतरपीक पद्धतीमध्ये एका पिकाचे नुकसान झाले तरी दुसऱ्या पिकापासून काहीतरी उत्पादन मिळते. म्हणून सलग पीक लागवडीपेक्षा आंतरपीक फायदेशीर आहे.

- रब्बी हंगामात सहा ओळी हरभरा + तीन ओळी करडई (६:३) किंवा चार ओळी जवस + दोन ओळी करडई (४:२) ही आंतरपिक पद्धत फायदेशीर आहे.

# २१ ऑक्टोबर : राष्ट्रीय आयोडीन न्यूनता विकार दिवस

आधुनिक आणि धकाधकीच्या जीवनात काही आजाराचे प्रमाण बरेच अंशी वाढलेले आहे. अशाच आजारापैकी 'गलगंड' हा एक आजार आहे. आयोडीनच्या न्यूनतेमुळे मानवाला सर्वसाधारण किंवा अतिशय गंभीर असे शारीरिक व मानसिक आजार होऊ शकतात. सहजासहजी दिसणारा आणि ओळखता येणारा गलगंड हे आयोडीन न्यूनतेचे एक लक्षण आहे. आहारात आयोडीन न्यूनता (कमतरता) असणाऱ्या स्त्रियांमध्ये वारंवार गर्भपात व उपजत मृत्यू होतात. *हायपोथॉयरॉडीझम* मेंदूची वाढ खुंटणे, शारीरिक वाढ खुंटणे, बुद्यांक कमी होणे, मनोबल व बाल जिवित्वात घट असे दुष्परिणाम आयोडीनच्या कमतरतेमुळे होण्याची शक्यता असते.

गर्भवती स्त्रियांमध्ये जर गर्भपणात आयोडीनची कमतरता असेल तर गर्भाला पण आयोडीनची कमतरता भासते आणि त्याचे दुष्परिणाम *थॉयरॉक्झिनच्या* निर्मितीवर होतात. थॉयरॉक्झिनची निर्मिती योग्यरित्या न झाल्याने गर्भाची बौध्दीक व शारीरिक वाढ नैसर्गिकरीतीने होत नाही. अशाप्रकारे बुध्दीची खुंटलेली वाढ ही कायम स्वरुपाची व भविष्यात बौध्दीक विकासाला आळा घालणारी ठरु शकते.सर्वेक्षणात असे सिध्द झाले की, आयोडीनच्या कमतरतेमुळे सर्व शाळांमधील मुलांचा बुध्यांक हा १० ते १५ गुणांनी कमी असतो.

*आयोडीनच्या न्यूनतेमुळे होणारे विकार :*गर्भपात, उपजत मृत्यू, जन्मजात दोष, प्रसूती पश्चात बालमृत्यू मध्ये वाढ, अर्भक मृत्यू मधील वाढ आदी विकार आयोडीनच्या न्यूनतेमुळे होऊ शकतात.

*मज्जासंस्थेतील होणार विकार :* मतीमंदपणा, मानसिक पंगुत्व, ग्रंथीदोषामुळे येणारा मतीमंदपणा, बुटकेपणा, खुजेपणा, मानसिक व शारीरिक दोष आदी विकार आयोडीनच्या न्यूनतेमुळे होऊ शकतात. नवजातांमध्ये गलगंड, नवजात हायपोथायराडीझम गलगंड तसेच बालकांमध्ये बाल्यावस्थेतील हायपोथायराडीझम, प्रौढांमध्ये मानसिक दुर्बलता, शारीरिक वाढ खुंटणे तर तरुणांमध्ये गलगंड व हायपोथायराडीझम

*बालकांमध्ये मानसिक दुर्बलता व मंतिमंदत्व येण्याची कारणे :*आईच्या गर्भाशयात वाढणाऱ्या बाळाला त्याच्या मेंदूच्या व शरीराच्या सर्वसाधारण वाढीसाठी आणि विकासासाठी योग्य प्रमाणात नियमित आयोडीनचा पुरवठा आवश्यक असतो. बाळाला फक्त आईच आवश्यक आयोडीनचा पुरवठा करु शकते. जर आईच्या शरीरामध्ये आयोडीनची कमतरता असेल तर गर्भाला सुध्दा आयोडीनचा पुरवठा होत नाही. जर आईच्या शरीरात




'२१ ऑक्टोबर २०२४' हा दिवस 'जागतिक आयोडीन न्यूनता विकार प्रतिबंधात्मक दिवस' म्हणून साजरा करण्यासाठी या काळात आयोडीन अभावी होणाऱ्या विकारावर मात करण्यासाठी आयोडीनयुक्त मीठाला खाण्याकरीता वापर सर्वत्र होणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा लेख सर्वसामान्य लोकांना आयोडीनयुक्त मीठाचे महत्व पटवून देण्यासाठी आरोग्य संदेश घरोघरी पोहोचविण्याचा या लेखाव्दारे प्रयत्न आहे.

आयोडिनची कमतरता जास्त प्रमाणात असेल तर बाळाची शारिरिक आणि बौध्दीक वाढ कायमस्वरुपी खुंटते आणि बाळ मतिमंद होतो. तसेच इतरांप्रमाणे बोलू, चालू आणि विचार करु शकत नाही. जर आईच्या शरीरातील आयोडीनची कमतरता सौम्य प्रमाणात असेल तर त्याचा परिणाम बाळावर होतो. आईच्या शरीरातील आयोडीन कमतरतेचा परिणाम बाळाच्या भावी आयुष्यात दिसून येतो.भविष्यात अशा समस्या टाळता याव्यात म्हणून प्रत्येकांनी जेवणात आयोडीनयुक्त मिठाचा वापर करावा. आयोडीनयुक्त मीठ हे साधेच मीठ असते ज्यामध्ये आयोडीन हे संयुगाच्या स्वरुपात योग्य प्रमाणात मिसळलेले असते. आयोडीनयुक्त मीठ हे दिसायला, चवीला आणि वासाला नेहमीच्या साध्या मीठा प्रमाणेच असते. ते आपण आपल्या रोजच्या जेवणात नेहमी प्रमाणे वापरु शकतो. हे मीठ अन्न शिजवताना तसेच फक्त खाण्यासाठी सुध्दा वापरु शकतो.आयोडीनयुक्त मिठातील आयोडीन हे हवेतील उष्णता व दमटपणा यामुळे निघुन जाते. म्हणून घरगुती वापराकरिता वापरले जाणारे आयोडीनयुक्त मीठ हे उष्णतेपासून लांब, हवाबंद आणि आर्द्रता विरहित बरणीमध्ये साठवून ठेवावे.वाहतुकदार, घाऊक विक्रेते आणि किरकोळ विक्रेत्यांनी सुध्दा आयोडीनयुक्त मीठ वाहतूक करताना आणि साठवून ठेवताना त्याचा बाहेरील वातावरणाशी (जसे सुर्यप्रकाश आणि पाऊस) संपर्क येऊन त्यातील आयोडीन निघून जाणार नाही, याची काळजी घ्यायला हवी.आयोडीनयुक्त मीठ हे रोजच्या वापरात खूपच कमी लागते. जसे प्रत्येकाला ५ जणांच्या कुटुंबाला १.५ किलोग्रॅम एवढे मीठ लागते. हे लक्षात घेता आयोडीन न्यूनता विकार यापासून बचाव हा मोठा फायदा होण्यासाठी कुटुंबाला खूपच कमी किंमत मोजावी लागते.आधी नमूद केल्याप्रमाणे भविष्यात माता आणि मुले यांच्यावर कोणतेही दूरगामी परिणाम होऊ नयेत म्हणून समाजातील प्रत्येक कुटुंबात आयोडीनयुक्त मिठाचाच वापर करावा.आयोडीनयुक्त मीठाचे महत्व सर्वांना कळावे यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकाने आयोडीन मीठाचा दैनंदिन खाण्यात वापरावे तसेच याबाबत अधिकाधिक जनजागृती करावी, असे आवाहन यानिमित्त करण्यात येत आहे. तसेच '२१ ऑक्टोबर २०२४' हा दिवस 'जागतिक आयोडीन न्यूनता विकार प्रतिबंधात्मक दिवस' म्हणून साजरा करावा.

**-डॉ. ज्योत्सना पोटपीटे,**
वैद्यकीय अधिकारी

शब्दांकन : विजय राऊत,
सहा. संचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
अमरावती-




# डाळ, तांदूळ - गव्हाच्या पिठात कीड - अळ्या झाल्या? घरगुती उपाय - डब्याभोवती किडे फिरकणारही नाही

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

स्वयंपाकघरातल्या धान्याची स्वच्छता महिन्याला करायला हवी अन्यथा तांदूळ, गहू आणि डाळीत किडे होतात. पोरकिड्यांमुळे धान्यांचे नुकसान होते. शिवाय या धान्यांचा वापर आपण आहारातही करू शकत नाही ज्यामुळे तब्येत बिघडण्याची शक्यता जास्त असते बरेच कीड धान्य पोखरून ठेवतात. ज्यामुळे धान्याच्या डब्यात काहीप्रमाणात पीठही तयार होते.




बऱ्याचदा थंडी किंवा पावसाळ्यात सूर्यप्रकाश नसल्यामुळे, डब्यात ठेवलेल्या डाळी आणि तांदूळांवर किडे आणि बुरशीची लागण होते. त्यामुळे महिन्याला डाळ, तांदूळ आणि गहू स्वच्छ करणं गरजेचं आहे. जर तांदूळ, गहू आणि डाळीला कीड लागू नये, असे वाटत असेल तर, काही घरगुती उपाय करून पाहा. या घरगुती उपायांमुळे डब्यात धान्य सुरक्षित राहतील. शिवाय त्यात कीड किंवा अळ्या तयार होणार नाही.

**धान्याला कीड लागू नये म्हणून..**

**कोरडी कडुलिंबाची पाने**

तांदूळ, गहू किंवा डाळींच्या डब्यात किड्यांनी घर केलं असेल तर, कडूलिंबाच्या पानांचा वापर करून पाहा. किडे घालवण्यासाठी डाळी आणि तांदळात कोरडी कडुलिंबाची पाने ठेवू शकता. त्याच्या तीव्र वासामुळे किडे आपोआप बाहेर येतील. फक्त एकच गोष्ट लक्षात ठेवा, कडूलिंबाची पानं पूर्णपणे कोरडी असायला हवीत.

**ना डाएट** - ना व्यायाम; फक्त दिवभारात 'एवढे' लिटर पाणी प्या; बघा वजनातला फरक झटपट

**तमालपत्र-** आपल्या स्वयंपाकघरातील मसाल्यांमध्ये आढळणारी तमालपत्रे धान्यातून किडे दूर ठेवण्यास मदत करते. त्याच्या सुगंधाने किडे पळू लागतात. आपण तांदूळ, गहू आणि डाळीच्या डब्यात तमालपत्र ठेवू शकता. कोणत्याही धान्याच्या डब्यात तमालपत्र ठेवता येईल.

**लसूण** -लसणाचा वास देखील कीटकांना दूर ठेवण्यास मदत करू शकतो. यासाठी डाळी आणि तांदळाच्या डब्यात लसणाच्या पाकळ्या ठेवा. जेव्हा लसणाच्या पाकळ्या सुकतात. तेव्हा त्यांना काढून टाका. दुसऱ्या लसणाच्या पाकळ्या डब्यांमध्ये घाला. यामुळे धान्यांना कीड लागणार नाही.

**काळी मिरी-** आपण काळी मिरीच्या मदतीने कीटकांनाही दूर करू शकता. यासाठी काळी मिरी कापडात बांधून डाळी आणि तांदळाच्या डब्यात मधोमध ठेवा.

**मॅच बॉक्स** धान्यांना कीटकांपासून दूर ठेवण्यासाठी मॅच बॉक्स उपयुक्त ठरते. त्यात असलेल्या सल्फरमुळे कीटक पळून जातात. त्यासाठी माचिसची पेटी बांधून डब्यात ठेवा.

# पुण्यतिथीनिमित्त मोझरी येथे जयगुरु पाणपोई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती,-**

मानवतेचे महान पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवात अ.भा.श्री गुरूदेव सेवामंडळ गुरूकुंज आश्रम मोझरी आणि महावितरण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जयगुरू पाणपोई शुभारंभ लक्ष्मणराव गमे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी महावितरण तिवसा उपविभागीचे उपकार्यकारी अभियंता निलेशजी उईके, सहाय्यक अभियंत नवनित सावरकर, कनिष्ठ अभियंता अश्विनी पाटील तसेच अ.भा.श्री गुरुदेव सेवा मंडळाचे दामोधर पाटील गुरुजी, ह.भ.प. प्रकाश महाजन वाघ, महात्मा फुले बहुउद्देशीय संस्थानचे अध्यक्ष प्रभाकरराव घाटोळ, ज्ञानेश्वर मुळे, तावडे, सुशील भरडे,अमर साखरे, आर्यन दाळु , यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्य गुरूदेव भक्तांची तहान भागविता यावी यासाठी दरवर्षी महावितरणचे वरिष्ठ यंत्रचालक गणेश घाटोळ यांच्या पुढाकारातून जयगुरू पाणपोईचे नियोजन करण्यात येते.पुण्यतिथी निमित्त आलेल्या हजारो भक्तांना पाणी पाजण्याचे काम या पानपोईच्या माध्यमातून करण्यात येते.




RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २१ ऑक्टोबर २०२४ — शहर/ग्रामिण




# आपले गांव-आपला बूथ सक्षमपणे सांभाळा; विजय आपलाच

## महाविकास युवा आघाडी मेळाव्यात उसळली तरुणाईची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती -** युवक कार्यकर्त्यांनो आपले गांव-आपला बूथ सक्षमपणे सांभाळा;विजय आपलाच असला तरी हि लढाई मोठी असल्याने कुणीही गाफील राहू नये, असे जाहीर आवाहन काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी रविवारी केले. अमरावती शहरातील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भाव येथे आयोजित महाविकास युवा आघाडी मेळाव्यात त्या उपस्थित हजारों तरुणाईच्या गर्दीला संबोधीत करीत होत्या. या मेळाव्याला खासदार बळवंत वानखडे यांचेसह भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी (शरद पवार) गटाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देश विघातकी शक्तीच्या विरोधात पुन्हा पेटून उठण्याची वेळ आली आहे. विरोधक विधानसभा निवडणुकीत नागरिकांची दिशाभूल करण्यासाठी लाखों खर्च करून मोठं-मोठे होर्डिंग लावून सरकारचे गोडवे गात असले तरी निवडणूक जिंकण्यासाठी भाजप मित्र पक्षांकडून उधळल्या जात असलेला हा पैसा जनतेच्या घामाचा पैसा आहे. याची जाणीव त्यांना करून देण्यासाठी या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतील सर्व नेत्यांनी-कार्यकर्त्यांनी सर्व भेदभाव विसरून एकजुटीने काम करावे. असे जाहीर



आवाहनही यशोमती ठाकूर यांनी केले. त्यांच्या या आवाहनाला उपस्थितांकडूनही भरघोस प्रतिसाद मिळाला.यावेळी या युवा मेळाव्यास खासदार बळवंतराव वानखडे, आमदार ड. यशोमती ठाकूर, नितिन हटवार, नरेंद्र निर्मळ, मनोज देशमुख, मोरेश्वर इंगळे, सागर देशमुख, पराग गुडधे, शिवराज चौधरी, उमेश शहाणे, मनोज अंबाडकर, गोविंद पोलाड, हरीष मोरे, हरीभाऊ मोहोड, मुकद्दर पठान, पंकज मोरे, संजय नागोने, अंसार भाई, श्रीकांत बोंडे, अमित गावंडे, वेदांत केने, हर्षल काळबांडे, डॉ. चंद्रशेखर कुरळकर, ज्योती ठाकरे, शिल्पा महल्ले, विरेंद्रसिंह जाधव, प्रविण मनोहरे, पंकज देशमुख, पंकज देशमुख, वैभव वानखडे, शैलेष काळबांडे, योगेश वानखडे, रितेश पांडव, शरद वानखडे, नंदकिशोर पोलगावंडे, अंकुश जुनघरे, निलेश कडु, मुकुंद पुनसे, राजु जुवार, सईद भाई, सौरभ किरकटे, लुकेश केने, आकाश मोहोरे, स्वराज चांगोले, हर्षल देशमुख, प्रज्योत यावले, विजय मुंडाले, श्याम बोबडे, किसन मुंदाने यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..बॉक्सतिवसा विधानसभा मतदारसंघ हेच माझे कुटुंबतिवसा मतदार संघ हाच माझा परिवार आहे. माझ्या परिवारासाठी काहीही करण्यास मी तयार असून यासाठी तिवसा वासियांच्या आशीर्वादानेच लढण्याचे बळ मिळत असल्याचे प्रतिपादन या मेळाव्यात त्यांनी यावेळी केले. आपली लढाई हि विचारांची लढाई असून ती विचारांनीच लढल्या जाणार असल्याचेही यशोमती ठाकूर यांनी सांगितले.

बॉक्सकल्पनाही करू शकत नाही अस्या घटना घडल्यागेल्या ५ वर्षांत राज्यात अशा काही घटना घडल्या ज्यांची यापूर्वी कधी कल्पनाही केली नव्हती. गद्दार भाजपा ने ज्या बाळासाहेबांच्या हिमतीवर राज्यात विस्तार केला त्यांनी त्यांच्याच मुलाच्या पाठीत खंजीर खुपसला. शिवसेना पक्ष तोडून दोन तुकडे केले. इतक्यावरच त्यांचे समाधान झाले नाही तर राष्ट्रवादी पक्षातही त्यांनी खिंडार पडून फूट टाकली आणि सत्ता हस्तगत केली. परंतु आता आपल्याला राज्य व संविधान वाचवण्याची लढाई लढून राज्याला विकसित करायचे आहे. कितीही संकटे आली तरी सत्याचाच विजय निच्छित असल्याने विरोधकांना जशास तसे उत्तर देऊन नागरिकांची होत असलेली दिशाभूल रोखण्याचे आवाहनही यशोमती ठाकूर यांनी उपस्थित तरूणाईस केले.

## अचलपुर मतदार संघातून भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रविण तायडे तर धामणगांव रेल्वेमधून आ. प्रताप अडसड यांना उमेदवारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती-**
निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय कार्यालयाकडून राज्यातील ९९ उमेदवारांची पहिली यादी घोषीत केली आहे. पहिल्या यादीत अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे आणि अचलपुर मतदार संघातील भाजपा उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. धामणगाव रेल्वे मतदार संघातून भाजपाचे विद्यमान आ. प्रताप अरुण अडसड यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर अचलपुर मतदार संघातून भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रविण तायडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यादीत उपमुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांना नागपुर दक्षिण ५२ मतदार संघातून उमेदवारी देण्यात आली आहे. तर कामठी ५८ मतदार संघातून भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना उमेदवारी घोषीत करण्यात आली आहे.





आगामी २० नोहेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या निवडणुकीसाठी महायुती व महाविकास आघाडीने कंबर कसली आहे.महाविकास आघाडीमध्ये अद्यापही जागा वाटपाचा तिढा कायम असतांना महायुतीकडून मात्र भाजपाने आपल्या ९९ उमेदवारांची पहीली यादी घोषीत केली आहे. या यादीमध्ये अमरावती जिल्ह्यात धामणगाव रेल्वे मतदार संघातुन विद्यमान आ. प्रताप अरुण अडसड यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. आ. प्रताप अडसड हे भाजपाचे जेष्ठ नेते अरुण अडसड यांचे पुत्र आहेत. तर अचलपुर विधानसभा मतदार संघातून भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रविण तायडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.प्रविण तायडे हे जिल्हा परिषदेचे माजी पक्षनेता राहीलेले आहेत. भाजप नेता प्रविण दरेकर यांच्याशी प्रविण तायडे यांचे घनिष्ठ सबंध आहे जाहीर झालेल्या जिल्ह्यातील दे जागांसह भाजपाकडून तिवसा, मोड वरुड, या मतदारसंघावर सुध्दा दा करण्यात येत आहे. तसेच अि पवार गटाकडून सुध्दा मोशी का मतदार संघावर दावा करण्यात आहे. मोर्शी वरुड मतदार संघाम देवेंद्र भुयार विद्यमान आमदार अ ते अजित पवार गटामध्ये सहम आहेत. भाजपाकडूनकरण्यात येणाऱ्या दुसऱ्या यादीन जिल्ह्यातील महायुतीतील पक्षांना किती जागा मिळणार चित्र स्पष्ट होणार आहे.

### मतदारांच्या आशीर्वादाने दुसऱ्यांदा विजयी होणार




माझं पहिल्या यादीत नाव आलंत्यामुळेसर्वव भाजप नेत्यांचे आभार मानतो तर चांगला विजय - दुसर्यादा खेचून आणेल असा दावा त्यांनी केला तर अडीच वर्षे कोरोना आला नंतर अडीच वर्षात अभूतपूर्व विकास मतदार संघात झाला तर येणाऱ्या पाच वर्षात आणखी विकास काम करायच आहे तरुणांना रोजगार व पांदण रस्ते याबाबत समस्या निकाली काढू तर महिलांना रोजगार देऊ असा मतदार संघाचा सर्वांगिन विकास करायचा आहे धामणगाव मतदार संघ विकासाच मॉडेल तयार करण्यात आले आहे.

आ.प्रताप अडसड

## अरे देवा !! सात दिवस तळीरामांची पंचाईत

### निवडणुकीच्या कालावधीत 'ड्राय डे' घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती-**
महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. येत्या २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. राज्यात आचारसंहिताही लागू करण्यात आली आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतर आता राज्यात राजकीय घडमोडींना प्रचंड वेग आला आहे. अशातच निवडणुकांच्या तारखा जाहीर होताच काही दिवस 'ड्राय डे' असणार आहे. या काळात तळीरामांची पंचाईत होणार आहे. निवडणुकांच्या काळात मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध माध्यमातून आमिष दिले जाते. जेवणावळी, पैसे, दारू वाटून मतदारांना आकर्षित केले जाते. याच चुकीच्या गोष्टी होऊ नये म्हणून निवडणुकीच्या महत्त्वपूर्ण दिवसांमध्ये दारूविक्रीला बंदी केली जाते. राजकीय पक्षानी आणि उमेदवारांनी मतदारांना




आमिष म्हणून दारूचा वापर करू नये, यासाठी निवडणूक आयोगाने मतदानाच्या ४८ तास आधी म्हणजे दोन दिवसांपूर्वी 'ड्राय डे' घोषित केला आहे. तसा नियमचबनविण्यात आला आहे. या नियमानुसार मतदारांना आमिष म्हणून दारू सेवन आणि वितरण रोखण्यासाठी संपूर्ण राज्यांमध्ये दारुची दुकाने बंद ठेवली जातात. महाराष्ट्रात कोणत्या दिवशी 'ड्राय डे' असणार आहे, याची माहिती समोर आली आहे. १ नोव्हेंबरला दिवाळी, १२ नोव्हेंबरला कार्तिकी एकादशी तर १५ नोव्हेंबरला गुरुनानक जयंतीनिमित्त 'ड्राय डे' असणार आहे. १८ नोव्हेंबरला संध्याकाळी विधानसभा ५ वाजेनंतर निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा थंडावल्यानंतर २० नोव्हेंबरला मतदान पार पडेपर्यंत राज्यातील दारूची दुकाने बंद राहणार आहेत. २३ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल असल्यामुळे त्यादिवशीही 'ड्राय डे' असणार आहे.-

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त

## राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीत एकदिवसीय बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५६ वा पुण्यतिथी महोत्सव सोमवार दि. २१ ऑक्टोबर २०२४ रोजी मोझरी येथील गुरुदेव नगर येथे साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त दरवर्षीप्रमाणे मौन श्रध्दांजली वाहण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी सुमारे एक ते दीड लाख भक्तगण समाधीस्थळी जमतात. या कार्यक्रमादरम्यान होणारी गर्दी पाहता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावरील वाहतुक व्यवस्थेत एकदिवसीय बदल करण्यात आला आहे. यानुसार अमरावतीकडून तिवसा तालुक्यातील मोझरी - गुरुदेव नगर मार्गे नागपूरकडे जाणारी वाहतूक (एसटी बसेस, रुग्णवाहिका व अग्निशमन वाहन वगळून) नांदगाव पेठ पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून मोर्शीमार्गे नागपूरकडे वळविण्यात येत आहे. नागपूरकडून अमरावतीकडे येणारी वाहतूक (एसटी बसेस, रुग्णवाहिका व अग्निशमन वाहन वगळून) तिवसा शहरातील पंचवटी चौकातून कुऱ्हा मार्गे अमरावतीकडे वळविण्यात येत आहे. ही वाहतूक व्यवस्था दि. २१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत वरील मार्गाने वळविण्यात येत आहे. या अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या विरुध्द मोटार वाहन कायदा व मुंबई पोलीस कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाअधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

## सोने लुटमार प्रकरणी दोन संशयित ताब्यात

### आतापर्यंत दीडशे पेक्षा जास्त ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती-**
कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जयस्तंभ ते मालवीय चौकात असलेल्या अलंकार ज्वेलर्समधून ग्राहक बनून ६.१३ लाखोचे सोने लुटमार प्रकरणी गुन्हेशाखेने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे दोन संशयित आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेतले असून वृत्तलिहेस्तोव पोलिस दोन्ही संशयीतांची कसून चौकशी करितहोती. यासह गुन्हेशाखेची अन्य टीमने आतापर्यंत दीडशे पेक्षा जास्त ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले आहे.जयस्तंभ मार्गावरील सहकार भवनजवळ नितीन पारेख यांचे श्री अलंकार ज्वेलर्स आर्ट नामक प्रतिष्ठान आहे. शुक्रवार १८ ऑक्टोंबर रोजीदुपारी १.३० वाजताच्या सुमारास एक भामटा ग्राहक बनून त्यांच्या प्रतिष्ठानात व गेला. त्याने अंगठी खरेदी करायची ह आहे, असे पारेख यांना म्हटले. त्यानुसार पारेख यांनी त्याला काही अंगठ्या दाखविल्या. त्यावर भामट्याने ४ अंगठ्या आपल्या हाताच्या बोटात घातल्या. त्याचवेळी त्याने पारेख यांनाब्रेसलेट खरेदी करायचे आहे, असे म्हटले. त्यानुसार पारेख यांनी त्याला काही ब्रेसलेट दाखविले. त्यातील १ ब्रेसलेट भामट्याने आपल्या हाताला बांधले. त्यानंतर भुंकण्याचा बहाण्याने प्रतिष्ठानाबाहेर पडला आणि तेथून पूर्वीपासून दुचाकीवर तयार असलेल्या साथीदारासोबत त्याने पोबारा केला. ग्राहक बनून आलेला भामटा ४ अंगठ्या व १ब्रेसलेट असे एकूण ६ लाख १३ हजाराचे सोने घेऊन पसार झाला. याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हेशाखेने या प्रकरणाचा समांतर तपास सुरू केला. गुन्हेशाखेने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे दोन संशयीतताब्यात घेतले आहे.

## उद्यापासून विधानसभा उमेदवारी अर्जांची धामधुम

### पोस्ट ऑफीस ते तहसील मार्गावरील वाहतूक बंद

### वाहन धारकांसाठी पर्यायी मार्ग निश्चितवाहतूक पोलिसांची अधिसुचना जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती -**
विधानसभा निवडणूकीचे नामांकण अर्ज दाखल करण्याची धामधुम २२ ते २९ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे. बडनेरा मतदार संघासाठी अमरावती तहसिल कार्यालयात नामांकण अर्ज दाखल होणार असल्याने वाहतूक पोलिसांनीनामांकण अर्जदाखल करण्याच्या मुदतीत यास श्याम चौकातील पोस्ट ऑफीस ते अमरावती तहसिल कार्यालय मार्गावरील सीम वाहतुक बंद केली आहे. तसेच वाहनधारकांसाठी पर्यायी मार्गाची व्यवस्था केली आहे. बडनेरा मतदार संघासाठी कोतवालीपोलिस ठाण्याच्या हद्दीतील श्याम चौकातील जुने तहसिल कार्यालयात नामांकण अर्ज भरण्यात येणार आहे. हा परिसर अ अत्यंत गजबजलेला असून तेथे मोठया प्रमाणात वाहतुक होत वि असते. नामांकण अर्ज दाखल करण्यासाठीसंभाव्यउमेदवारहे



मोठया संख्येने कार्यकर्त्यांसह येणार असल्याने वाहतुकीची कोंडी व अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतुक पोलिसांनी २२ ते १९ ऑक्टोबर दरम्यान मेन पोस्ट ऑफीस ते तहसिल कार्यालय मार्गावरील वाहतुक बंद केली आहे. ज्या वाहन धारकांना श्याम चौक, साबनपुरा, बापट चौक, जवाहरगेट मार्गावर जायचे आहे, त्यांना वाहतुक पोलिसांनी निश्चित केलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार आहे. त्यासोबतच मुख्य पोस्ट ऑफीस ते तहसिल कार्यालय या मार्गावरील आस्थापना धारकांनी आपले वाहन १० वाजेच्या पूर्वी आस्थापनेकरिता आरक्षित पार्कींगमध्ये ठेवावे लागणार आहे. वरील नमूद कालावधीत वाहन धारकांनी वाहतुक पोलिसांनी काढलेल्या अधिसुचनेनुसार वाहतुक करताना उल्लंघन केल्यास त्यांच्यावर एमव्ही ॲक्टनुसार कठोर

कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारावाहतुक विभागाचे एसीपी संजय खताळे यांनी काढलेल्या अधिसुचनेत देण्यात आला आहे.

# अमरावती प्रॉपर्टी डेवलपर्स अ‍ॅन्ड ब्रोकर्स असोसिएशनची स्थापना

# अनिल अग्रवाल अध्यक्ष तर विजय तलडा सचिवपदी-कोषाध्यक्षपदी पूरण हबलानी यांची निवड

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती** :अमरावती महानगराच्या विस्तार व विकासासोबतच शहराच्या सौंदर्यिकरणात महत्वपूर्ण भूमिका निभावणार्या भूविकसक अर्थात लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स यांनी आपली एकजुट दाखवित अमरावती लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स असोसिएशनची स्थापना केली. त्यानिमित्ताने कॅम्प परिसरातील हॉटेल ग्रँड महफिलच्या रुबी हॉलमध्ये या संघटनेचे पहिले संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यात सर्वसंमतीने संघटनेच्या कार्यकारिणीचे गठन करण्यात आले. पत्रकारितेसोबतच रियल इस्टेट व्यवसायाच्या क्षेत्रात सक्रिय असलेले दै. अमरावती मंडल व दै. मातृभूमिचे संपादक अनिल अग्रवाल यांची सर्व लँड डेवलपर्स व ब्रोकर्स यांनी एकमताने संघटनेच्या अध्यक्षपदी निवड केली.तसेच विजय तलडा यांची सचिव व पूरण हबलानी यांची कोषाध्यक्ष पदी निवड झाली. संघटनेचे पाच उपाध्यक्ष राहणार असून या पदावर गोपाल पनपालिया, मनोज भेंडे, आकाश मालू, सुधीर वाकोडे आणि कैलास गिरोडकर यांची नियुक्ती करण्यात आली.आपले बुद्धीचातुर्य व व्यवसाय कौशल्याच्या जोरावर तसेच स्वत:च्या खिशातून गुंतवणूक करुन रियल इस्टेट च्या व्यवसायात कार्यरत राहणारे लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स आतापर्यंत




शहरात असंघटित राहुण कार्य करित होते. त्यामुळे त्यांना अनेकदा सरकारी व प्रशासकिय धोरणांमुळे अन्यायही सहन करावा लागत होता. त्यामुळे त्यांना अडचणींचा सामना करित व्यवसायात नूकसान सोसावे लागायचे. ही बाब लक्षात घेउन अमरावती महानगरातील काही लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स यांच्यात एक सशक्त व्यासपीठ निर्माण करण्यासंदर्भात विचार विनिमय सुरु होता. अनेक बैठका झाल्यानंतर लँड डेवलपर्स व ब्रोकर्स असोसिएशनची स्थापना करण्याबाबत रुपरेखा तयार करण्यात आली. आणि आज रविवार, २० ऑक्टोबर रोजी हॉटेल महफिल इनच्या रुबी हॉलमध्ये भव्य संमेलनाद्वारे त्याला मूर्त रुप देण्यात आले. शहरातील सर्व लँड डेवलपर्स व ब्रोकर्स यांना संमेलनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. सुमारे एक हजारावर प्रतिनिधींनी संमेलनाला आपली उपस्थिती दर्शविली.अमरावती शहराच्या रियल इस्टेट क्षेत्राला आपल्या कार्यातून एक नवा आयाम देणारे दिवंगत प्रविण मालू यांच्या प्रतिमेला माल्यार्पन व अभिवादन करुन या संमेलनाची सुरुवात करण्यात आली. संघटनेची संकल्पना मांडून गत काही महिन्यांपासून त्यावर सतत कार्य करित असलेल्या गणमान्य व्यावसायिकांना मंचावर आमंत्रित करण्यात आले. मनोज भेंडे यांनी प्रास्ताविकातून संघटनेची आवश्यकता व महत्व यावर आपले विचार व्यक्त केले. त्यांनी संघटनेच्या प्रथम कार्यकारिणीच्या पदाधिकार्यां साठी निवडण्यात आलेली नावे उपस्थितांसमोर ठेवली व त्यावर प्रतिक्रिया मागितल्या: यावेळी सभागृहात उपस्थित प्रत्येक व्यक्तीने संघटनेने प्रस्तावित केलेल्या कार्यकारिणीला आपली सहमती दर्शविली. त्यामुळे या कार्यकारिणीची निवड सर्वसंमतीने करण्यात आली. त्यानुसार अध्यक्षपदी अनिल अग्रवाल, सचिवपदी विजय तलडा, कोषाध्यक्ष पूरण हबलानी, उपाध्यक्षपदी गोपाल पनपालिया, मनोज भेंडे, आकाश मालू, सुधीर वाकोडे आणि कैलास गिरोडकर यांची एकमताने निवड झाली. तसेच सहसचिव पदी रामेश्वर गग्गड, संरक्षक पदी सुभाष तलडा आणि हारुणभाई सुपारीवाले यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून कैलास पाडलकर, बब्बू मोतीवाला, योगेश सवई, श्याम बख्तार, अरुण कालबांडे, रामचंद्र गुप्ता, विनोद राठी, किशोर भुयार, डॉ. नासीर टिक्की, अमित साहू, जीतु मोटवानी, नवीन चोरडीया, शरद दादलानी, प्रवीण अलसपुरे, ज्ञानेश्वर हिवसे आणि किशोर देशमुख यांचा समावेश करण्यात आला. सर्व नवनियुक्त पदाधिकार्यांचे संघटनेच्या वतीने विनोद राठी, प्रशांत पनपालीया, कैलास पाडलकर, बब्बू मोतीवाला, योगेश सवई, अरूण कालबांडे, जीतु मोटवानी, अमित साहू आणि रामचंद्र गुप्ता यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.नवनियुक्त अध्यक्ष अनिल अग्रवाल व संघटनेच्या इतर पदाधिकार्यांनी समयोचित विचार व्यक्त करताना लँड डेवलपर्स आणि प्रॉपर्टी ब्रोकर्स व्यावसायिकांच्या एकजुटीवर भर दिला. या व्यवसायासंदर्भातील आपले अनूभव त्यांनी कथन केले. बहुतांश जणांनी सांगितले की, अत्यंत छोट्या स्तरावरुन आपण या व्यवसायाला सुरुवात करित या क्षेत्रात पाउल ठेवले होते. आज या व्यवसायाद्वारे जीवनात सर्व प्रकारचे यश प्राप्त करुन आपली स्वप्नेही साकार केली आहेत. सोबतच आपली पुढील पिढीही याच व्यवसायात आहे. नवीन पिढीतील सदस्यही या व्यवसायात उत्तम काम करित आहेत.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन शैलेश शिरभाते यांनी केले. संमलनादरम्यान शहरातील एका प्रॉपर्टी ब्रोकर व्यावसायिकाचे निधन झाल्याची बातमी प्राप्त झाली. दिवंगत व्यावसायिकांना यावेळी दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राष्ट्रगिताने या संमेलनाची सांगता झाली. शेवटी सर्व लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स यांनी स्नेह भोजनाचा आनंद घेतला. या संमेलनाला अमरावती शहरात लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स म्हणून काम करणारे अमित साहू, गोकुल गग्गड, अरुण कालबांडे, शैलेश शिरभाते, मेमदास किसन चव्हाण, नितीन बालासाहेब ठाकरे, अमीत मोतीवाला, ज्ञानेश्वर हिवसे,संजय खंडेलवाल, राहूल बानुवकोडे, अजय इंगोले, कैलाश गिरुलकर, कैलाश पाडालकर, धनंजय रहाटे, महेश यादव, नितिन देशमुख, मयुर जिरापुरे, शंकरराव लसनकार, तुकाराम सारवे, विनोद राठी, योगेश लोंदे, मालवे बिल्डर्स, गंगाधर राउत, नईम सुभेदार, शुभम पुरी, सागर बनकर, विशाल राठी, नारायण नेरकर, व्यंकटेश नेरकर, आशिष राठी, अंकुश कोराट, रामभाऊ थोराट, सतीश बिजवे, गजेन्द्र काले, धनराज खत्री,निलेश राऊत, सतीश खरबडे, आशिष भोपले, दारोकर, राजेश माहोरे, सह नामवंत बिल्डर उपस्थित होते.

## भूमाफिया नाही...आम्ही भूशिल्पकार आहोत

### नवनियुक्त अध्यक्ष अनिल अग्रवाल यांची भूमिका

लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स असोसिएशनचे सर्वसंमतीने प्रथम अध्यक्षपदी निवड झालेले दै. अमरावती मंडलचे संपादक अनिल अग्रवाल यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, रियल इस्टेटच्या व्यवसायाशी जुळलेल्या लोकांना प्रामुख्याने भू-विकसक म्हणजेच लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स यांना सामान्य चर्चेतील भाषेत भूमाफिया संबोधले जाते. परंतू वास्तविकता अशी आहे की आम्ही भूमाफिया नाही तर भूशिल्पकार आहोत. आम्ही जमीनीची मातेसमान पूजा करतो व मोठमोठ्या जमीनींचे छोटे-छोटे भाग करुन सामान्य लोकांच्या निवासाची सोय करतो. भूविकसक व प्रॉपर्टी ब्रोकर्स यांची शहराचा विस्तार आणि विकासात सर्वात महत्वाची भूमिका असते. ज्यांनी २५-३० वर्षांपूर्वीचे अमरावती शहर बघितले आहे, ते आजच्या अमरावतीकडे बघितल्यानंतर ही बाब नक्कीच समजू शकतात. मात्र शहराच्या विस्तार आणि विकासात आपले सर्वाधिक योदान देणार्या रियल इस्टेट व्यावसायिकांना सरकार व प्रशासन तसेच समाजाकडून ते ज्या सन्मानासाठी खर्या अर्थाने पात्र आहेत, तो दिला जात नाही, अशी खंत अनिल अग्रवाल यांनी व्यक्त केली. अनिल अग्रवाल यांनी यावेळी अमरावतीच्या रियल इस्टेट सेक्टरला नविन आयाम व उंची प्रदान करणारे प्रविण मालू यांचे स्मरण केले. प्रविण मालू यांच्या मार्गदर्शनातच आपण रियल इस्टेट व्यवसायाचे बारकावे समजून घेतल्याचे अग्रवाल यांनी सांगितले. प्रविण मालू यांच्या मार्गदर्शनामुळे शहरात अनेक नवीन लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स तयार झाले, त्यांनी पुढे अमरावती शहराचा चेहरामोहरा व नकाशा बदलून टाकला, असे अनिल अग्रवाल म्हणाले. सरकारी उदासिनता, प्रशासकिय अनास्था व राजकिय नेत्यांचे दुर्लक्ष यामुळे लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स यांना व्यवसाय करताना मोठ्या प्रमाणात समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे आपला सन्मान व स्वाभिमानासाठी आम्हाला एकजुट होवून काम करावे लागेल. असे अनिल अग्रवाल म्हणाले. कुणाचेही नाव न घेता अनिल अग्रवाल यांनी लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स यांच्या वाटेत अडचणी निर्माण करणार्या व जाणूनबूजून त्यांना त्रास देणार्या सरकारी अधिकार्यांवरही निशाना साधला. शेरो-शायरी द्वारे त्यांनी लँड डेवलपर्स व प्रॉपर्टी ब्रोकर्स यांना एकजुट राहण्याचा संदेश दिला.-



# दर्यापूर मतदारसंघातील गावा गावात नवनीत राणा यांना सर्वस्तरातून मोठा प्रतिसाद

## विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली





विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१दर्यापूर.**

दर्यापूर विधानसभा मतदारसंघात माजी खासदार नवनीत रवी राणा यांचे वाढते वर्चस्व पाहून विरोधकांना घाम फुटला आहे. आपल्या खासदारकीच्या कारकिर्दीत संपूर्ण दर्यापूर मतदारसंघात कोट्यवधीचे विकास कामे केली असल्याने नवनीत राणा यांना विधानसभा निवडणुकीत आमदार करावा. अशी जनसामान्यांची मागणी लक्षात घेता नवनीत राणा यांनी देखील दर्यापूर मतदारसंघात आपले लक्ष केंद्रीत केले आहे. मतदारसंघातील गावा गावात त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. एकच नारा, नवनीत राणाच आमदार हमारा, असे जाहीर घोषणा देखील गावा गावात जनसामान्यांकडून देण्यात येत आहे. दर्यापूर मतदारसंघातील लोकांचे म्हणणे आहे की, खासदार म्हणून नवनीत राणा यांनी जो जनसंपर्क ठेवला, तो आज पर्यंत ही कोणत्याही लोकप्रतिनिधींना जमलं नाही. दर्यापूर मतदारसंघातील प्रत्येक गावा गावात नवनीत राणा सर्वस्तराच्या लोकांना नावे घेऊन हाक मारतात. असला जिव्हाळा व आपुलकी देखील आज पर्यंत कोणत्याही लोकप्रतिनिधींनी दाखवली नाही. महिला, युवा आणि सर्वच घटकांत नवनीत राणा बद्दल जिव्हाळा आहे. लोकसभेत दर्यापूर मतदार संघातील मुद्दे उपस्थित करण्यात देखील त्यांनी लोकांच्या मनात एक स्नेह आहे.मतदारसंघातील प्रत्येक गावा गावात नवनीत राणाचे यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.निंबारी, कुंभारगाव, वणोजा, चिंचोली खु., चिंचोली बु., हिंगणी, सातेगाव, वडुरा, विहिगाव, हंतोडा, खिरगव्हाण, वनोजा, गावंडगाव, काळगव्हाण, मलकापूर, मुऱ्हा, हतोळा, शेंडगाव, पिंपळगव्हाण, एकलारा, घोडसगाव, कमालपुर (कोठा), हयापुर, लाखनवाडी, कोतेगाव, कोकर्डा, साखरी, जवळा बु., जवळा खु., चिंचोली (शिंगणे), डोंबाळा समवेत मतदारसंघातील प्रत्येक गावात वाढत्या प्रभावामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकत आहे.

# भीमटेकडी येथे वर्षावास कार्यक्रमाचे समापन

## आमदार राणा यांच्या हस्ते विकासकामाचे भूमिपूजन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती-** बौध्द धम्म प्रचार समिती भिम टेकडी येथे भदंत आर्य सारीपूत थेरो यांच्याव्दारे तीन महिन्याच्या पवित्र वर्षावास कार्यक्रमाचा समापन समारोह नुकताच झाला. यावेळी आ. रवि राणा यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती दर्शविली. अध्यक्षस्थानी भारत शहारे व प्रमुख अतिथी म्हणून प्रकाश रविराव उपस्थित होते.



आ.रवि राणा यांनी भंतेंना वंदन करुन आशीर्वाद घेतले तसेच उपस्थित उपासक व उपासिकांनी शुभेच्छा सुद्धा दिल्या. भंतें, भिक्षुक, उपासक व उपासिका यांना वाढपी म्हणून भोजन दिले. या वर्षावास कार्यक्रमाअंतर्गत आ.रवि राणा यांच्या हस्ते ३ कोटी रुपयांच्या विकास कामांचे भुमीपूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता आयोजक भारत शहारे, ,गोपाल इंगळे, किशोर तायडे, प्रसन्त्र गायकवाड, रमेशचंद्र रंगारी, नितीन बोरेकर, शुभम जनबंधू, नितीन तायडे, गौतम हिरे, घनशाम आकोडे, आनंद तायडे, प्रा. भगवान गोसावी, उत्तमराव शिंगणापुरे, ड.पी.टी. खडसे, डॉ. कमल राऊत, डॉ. प्रेमानंद तिडके, आयुष्यमान कुसुमताई वानखडे, प्रविण आकोडे, धम्मदास मुंदरखे तसेच असंख्य उपासक व उपासिका उपस्थित होते.

# जिल्ह्यातील ९ विद्यार्थ्यांना १४ लाख रुपयांची मदत

## ४० हजारांवर विद्यार्थ्यांना मिळाले शासकीय अनुदानाचे कवच

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१ अमरावती-** अपंगत्व आणि मृत्यू या कारणांमुळे जिल्ह्यातील नऊ विद्यार्थ्यांना १४ लाख रुपयांची शासकीय मदत पुरवण्यात आली आहे. याशिवाय चालू आर्थिक वर्षातील विद्यार्थ्यांचे ८ प्रस्ताव निर्णयाधीन असून अंतीम निर्णयानंतर त्यांनाही मदत पुरवली जाणार आहे. दरम्यान या योजनेची व्याप्ती जिल्ह्यातील १ हजार ५७६ शाळांपर्यंत वाढविण्यात आली असून त्यामुळे ४० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीचे कवच प्राप्त झाले आहे.



जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत ही योजना राबविली जाते. पूर्वी ती विमा कंपन्यांमार्फत राबवली जायची. परंतु कंपन्यांद्वारे दावे मंजूर करण्याचे प्रमाण फारच कमी असल्याने राज्य शासनाने ती स्वत:कडे घेतली. त्यामुळे नव्या योजनेला 'राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना' असे नाव देण्यात आले आहे. या योजनेचा लाभ पहिली ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना लागू असून त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीपुढे गतवर्षी नऊ प्रस्ताव आले होते. यापैकी तीन प्रस्ताव विद्यार्थ्यांच्या अपघाती मृत्यूचे होते तर इतर प्रस्ताव हे विद्यार्थ्यांचा अपघात झाल्याचे होते. सदर योजनेंतर्गत मृत्यू ओढवलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दीड लाख रुपये देण्यात आले. तर दोन अवयव निकामी झाल्याने कायमचे अपंगत्व आलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये आणि एक डोळा किंवा एक अवयव निकामी झाल्यास ७५ हजार रुपयांची मदत करण्यात आली.

### आठ प्रस्ताव निर्णयाधीन

चालू आर्थिक वर्षात पुन्हा आठ विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कारणांमुळे अपंगत्व आले आहे. जिल्ह्याच्या विविध भागांतील या प्रस्तावाची कागदपत्रे शाळांच्या माध्यमातून शिक्षणाधिकारी यांच्याकडे पोहोचली असून ती आगामी बैठकीत जिल्हाधिकारी यांच्यापुढे ठेवली जाणार असल्याचे शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले.-

# मैदानात गांजा पिणारे चार युवक जेरबंद

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१ अमरावती-** खुल्या मैदानात गांजा पिणाऱ्या चौघांना गुन्हेशाखेच्या पथकाने अटक करून नागपुरीगेट पोलिसांच्या ताब्यात दिले. शेख नईम शेख सलीम (वय ३०, रा. राजाकीर कॉलनी), हिपजुल आवेज मोहम्मद आसीफ (वय १९, रा. चाराबाजार), मोहिन मोहम्मद नुरमोहम्मद (वय ३४, रा. लालखडी) आणि जफरबेग कमरबेग (वय ४४, रा. लालखडी) अशी अटकेतील युवकांची नावे आहेत. रात्रीला खुल्या मैदानात बसून काही युवक दारू व गांजा पितातत्यामुळे गंभीर घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा गंभीर घटनेला आळा बसण्याकरिता शहर पोलिसांनी खुल्या मैदानात दारू व गांजा पिणाऱ्यांची धरपकड सुरु केली आहे.

शनिवारी रात्री गुन्हेशाखेचे पथक नागपुरीगेट पसिरात गस्तीवर असताना नागपुरीगेट पुलाखाली शेख नईम शेख सलीम हा गांजा पिताना दिसताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली असता प्लास्टीकच्या पाऊचमध्ये गांजा व एक चिलम दिसताच पोलिसांनी त्याला अटक केली. तसेच डिप्टीग्राउंडमध्येहिपजुल आवेज हा सुध्दा गांजा पिताना दिसताच त्याला ताब्यात घेऊन त्याच्या जवळून ४ ग्रॅम गांजा व गांजा पिण्याचे साहित्य जप्त केले. त्यानंतर लालखडी येथील खुल्या मैदानात पाहणी केली असता मोहिन व जफरबेग असे दोघे बिनधास्त गांजा पितांना दिसताच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन दोघांची तपासणी केली असता त्यांच्याजवळ ६ ग्रॅम गांजा व गांजा पिण्याचे साहित्य जप्त करून चौघांना नागपुरीगेट पोलिसांच्या ताब्यात दिले. या घटनेत पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली.

# डॉग शो मध्ये १५० हून अधिक श्वानांचा सहभाग

## डॉग कॅनन क्लबचे आयोजन : अनेक डॉग ठरले पुरस्काराचे मानकरी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती**-पाळीव प्राण्यांमध्ये कुत्रा सर्वातप्रामाणिक प्राणी मानला जातो. त्यामुळे आजही अनेक घरांमध्ये कुत्र्याने कुटुंबातील सदस्य म्हणून आपले स्थान निर्माण केले आहे. त्यामुळेच शहरात डॉग कॅनन क्लबने डॉग शो चे आयोजन केले. अकोला, वर्धा, नागपूर. अमरावती येथून यवतमाळ, आकर्षक सजावटीसह उपस्थित १५० हून अधिक श्वान आले. रेड कार्पेटवर चालताना त्यांनी आकर्षण दाखवलं. ज्यासाठी त्याला सर्वोत्कृष्ट श्वानाच्या विविध श्रेणींमध्ये सन्मानित करण्यात आले. रविवारी सकाळी ११ ते उशिरा रात्री स्थानिक सायन्सकोर मैदानावरचाललेल्या या डॉग शोमध्ये विविध जातींच्या श्वानांचा समावेश होता. सलग दुसऱ्या वर्षी शहरात भव्य आणि दिव्य स्वरुपात आयोजित करण्यात आलेल्या या डॉग शोमध्ये - कुत्र्यांच्या अनेक प्रजाती पाहायला मिळाल्या. ज्यामध्ये जर्मन शेफर्ड, - बुलडॉग, फ्रेंच बुलडॉग, सायबेरियन हस्की, पूडल, - चिहुआहुआ, मोठा अलास्का मलामुट, रॉटविलर, बर्नीज माउंटन



डॉग, बॉक्सर, बिचॉन फैस, माल्टीज, पोमेरेनियन, यॉर्कशायर टेरियर, हवानीज, पग, सामोयेद, शिबा इनू, डॉबरमन, अमेरिकन पिट बुल टेरियर, मालतीपू, अमेरिकन बुली, गोल्डन डूडल यासारख्या जाती समाविष्ट होत्या. या डॉग शोमध्ये सर्वांनी रॅम्प वॉक करून आपली शैली दाखवली. अनेक श्वान त्यांची कामगिरी, खेळकरपणा, आरोग्यासाठी विविध श्रेणींमध्ये जिंकले. यावेळी देखभाल, जाती आणि वयोगटानुसार पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमात डॉ. कवल पांडे व महापालिकेचे पशुवैद्यकीय शल्यचिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे ने विशेष सहकार्य केले. हैदराबादहून आलेल्या प्रवीण कुमार आणि डॉ. सुनील पोटफोडे यांनी या शोचे परीक्षण केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉग कॅनन क्लबचे जयदीप सराफ, नकुल पाचघरे, प्रशांत पोद्दार, सागर गोबाडे, नीलेश साबळे, मृणाल तेलमोरे, ऋषी देशमुख, अभिजीत जावरे, सार्थक पर्वतकर आदींनी अथक परिश्रम घेतले.

# दुबईत पहिले विश्व मुक्त सृजन मराठी साहित्य संमेलन अध्यक्षपदी साहित्यिका डॉ. मोना चिमोटे यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

दुबई येथे डिसेंबर महिन्यात भरणाऱ्या पहिल्या विश्व मुक्त सृजन मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अमरावतीच्या महिला साहित्यिकाची निवड झाली आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता तथा मराठी विभाग प्रमुख डॉ. मोना चिमोटे यांना हा मान मिळाला.

छत्रपती संभाजीनगर येथील मुक्त सृजन संस्था, मुक्त सृजन साहित्य पत्रिका आणि पुण्याच्या संस्कृती प्रकाशनाने या संमेलनाचे आयोजन केले आहे. दुबईत भरणारे हे पहिले संमेलन ५ ते १० डिसेंबर दरम्यान होईल, असे मुक्त सृजन साहित्य पत्रिकेचे संपादक डॉ. महेश खरात यांनी जाहीर केले. डॉ मोना मिलिंद चिमोटे या साहित्य समीक्षक व संशोधक असून लेखिका म्हणून त्यांची ओळख आहे. 'रहस्यकथा या कथाप्रकाराचा चिकित्सक अभ्यास' या विषयावरील शोधप्रबंधासाठी डॉ. चिमोटे यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने आचार्य ही पदवी प्रदान केली आहे.



'मराठी विज्ञान कथात्म साहित्याचा समाजावर होणारा परिणाम' या विषयावर त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाचा पोस्ट डॉक्टरेट अवॉर्डही प्राप्त झाला आहे. 'अनुवादीत विज्ञान कथात्म साहित्याचा मराठी विज्ञान कथात्म साहित्यावर झालेला प्रभाव' या विषयावर त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाचा मेजर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण केला. मराठी संकेतस्थळांची सूची, कवी अज्ञात यांची स्वच्छंद,अनुकंपा, डोहतळ, स्नेहदग्ध, ओघळांचे नकाशे, अनन्यशर आणि ''अज्ञातवास : एक काव्यखंड'' इत्यादी काव्यसंग्रहांचे संपादन त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या ''पळसबंध'' या ललित लेखसंग्रहास राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. शिवाय त्याचा हा संग्रह महाराजा सयाजीराव विद्यापीठातील बी.ए.भाग दोनसाठी मराठीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यांचे ''कालखंडाचा साहित्याभ्यास'' हे पुस्तक मुक्त विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी अभ्यासक्रमात समाविष्ट आहे.

**साठहून अधिक चर्चासत्र, परिसंवादात सहभाग**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, विश्व मराठी साहित्य संमेलन, विदर्भ साहित्य संमेलन अशा विविध साहित्य संमेलनातील चर्चासत्रांमध्ये डॉ. मोना चिमोटे यांनी सहभाग नोंदवला आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयातील साठपेक्षा अधिक चर्चासत्र व परिसंवादांमध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले आहेत. नामवंत साहित्यिक व कलावंतांच्या प्रकट मुलाखती त्यांनी घेतल्या आहेत.

आकाशवाणी आणि दूरदर्शनवरील विविध चर्चांमध्ये त्या सहभागी झाल्या आहेत. विदर्भ साहित्य संघाच्या व अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या कार्यकारीणी सदस्य म्हणून त्यांनी योगदान दिले आहे.

# सोयाबीनच्या नुकसानीने दिवाळीत आर्थिक गणित बिघडणार

## शेतकऱ्यांचा टाहो, परतीच्या पावसा बस्स करं रे बाबा, आता नको बरसू!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ यवतमाळ**

खरीप हंगाम संपून रब्बीची मशागत सुरू होण्याची वेळ आली. मात्र, पाऊस काही थांबला नाही. सोयाबीनचे पिक चांगले होईल, या आशेने शेतकरी मेहनत घेत होता. सोयाबीन काढणीची वेळ आली मात्र पाऊस सुरूच असल्याने अनेक शेतकऱ्यांचे पावसातच सोयाबीन भिजले. शनिवारी १९ ऑक्टोंबर रोजी दोन मंडळात अतिवृष्टी झाली. बहुतांश शेतकऱ्यांचे शेतातील सोयाबीन ओले झाले आहे. तसेच जिल्ह्यातील सात जनावरांचा मृत्यू झाला. तर दारव्हा तालुक्यात विज पडून एक जण जखमी झाला आहे. एकंदरित प्रचंड वेदनादायी ठरत असलेल्या या पावसाला बस्स करं रे बा, आता नको बरसू ! असे म्हणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.



जिल्ह्यात यंदा पावसाळ्यात प्रत्येक महिन्यात अतिवृष्टी झाली. त्याचा फटका शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसला. मात्र, चांगल्या पावसाने लहान मोठे प्रकल्प तुडुंब भरले आहे. असे असले तरी परतीच्या पावसाने जिल्ह्यात शुक्रवारपासून थैमान घातले आहे. शेतात शिवारात सोयाबीनचे पीक काढण्याचा हंगाम सुरू आहे. यातच वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. यामुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शनिवारी २३. ३० मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली. जिल्ह्यातील दोन महसुली मंडळांत अतिवृष्टी झाली असून कळंब तालुक्यातील ४० हेक्टरवरील सोयाबीन, कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तसेच केळापूर, दारव्हा, महागाव, यवतमाळ तालुक्यातील सात जनावरे दगावली आहे. शनिवारी दारव्हा तालुक्यातील मांगकिन्ही येथे शेतात काम करीत असलेल्या शेतकऱ्यांच्या अंगावर विज पडल्याने तो गंभीररीत्या जखमी झाला. सोबतच शेतामध्ये उभ्या असलेल्या कपाशी, तुरीच्या पिकासोबत काढणी सुरू असलेल्या सोयाबीनची चिंता शेतकऱ्यांना लागली आहे. असाच पाऊस राहिल्यास दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांची अडचण होणार आहे.

# मेळघाट मधिल कंत्राटी शिक्षकांचे मासिक वेतन दिवाळी पूर्वी दया

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

पेसा अंतर्गत पं.स. चिखलदरा व धारणी मधील शाळांवर नियुक्त कंत्राटी शिक्षकांचे वेतन दिवाळी पुर्वी करण्यात यावे अश्या मागणीचे निवेदन प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अजय पवार व जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी जि.प.अमरावती यांना आज दिले. माहे सप्टेंबर या महिण्यामध्ये जि.प. अमरावती अंतर्गत पं.स.धारणी व पं.स. चिखलदरा मधील शाळांमध्ये १२० ते १३० कंत्राटी शिक्षकांची नेमणुक प्रत्येक शाळेवर करण्यात आली आहे.या शिक्षकांनी संघटने कडे केलेल्या मागणीनुसार यांचे वेतन अजुन झालेले नाही. त्यामुळे आपणास विनंती की, शिक्षकांचे माहे सप्टेंबर व माहे ऑक्टोंबर २०२४ चे वेतन दिवाळी पुर्वी करण्यात यावे.दिवाळी हा महत्वाचा सण आहे तरी दोन्ही महीण्याचे वेतन देण्यात यावे अशी मागणी शिक्षक समितीने केली आहे.

# दिवाळीनिमित्त मेळघाटात जाणार १० हजार कपडे

## हेल्पिंग हँडचा उपक्रम, शैक्षणिक साहित्यासह मिठाईचेही वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१यवतमाळ**

गरज असेल त्या ठिकाणी मदतीसाठीसदैव तत्पर असणाऱ्या एमएच-२९हेल्पिंग हँडच्या पुढाकाराने अन्यवतमाळकरांच्या सहकार्यानेएमएच २९ हेल्पिंग हँडची टीमतब्बल दहा हजार कपडे व मिठाईपाकीट गरजूंसाठी मेळघाटातीलनवलगाव भागात वाटप करणारआहे. हेल्पिंग हँडच्या वतीने घेण्यातआलेल्या या पुढाकाराने हजारोगरजूंना दिवाळीनिमित्त कपडेमिळणार असून त्यांची दिवाळी गोडहोणार आहे.



मागील सहा वर्षांपासून एमएच २९हेल्पिंग हँडच्या वतीनेयवतमाळकरांना आवाहन करून, कपड्यांचे संकलन केल्या जाते. संकलित केलेले कपडे दिवाळी निमित्त वितरित करण्यात येतात. मात्र, त्यासंदर्भात केलेल्या सर्वेक्षणाअंती असे लक्षात आले की, तेथील आदिवासी नागरिकांना कपडे घालायला तर दूरच बघायला सुद्धा मिळत नाही. त्यामुळे यंदाच्या दिवाळीला चांगल्या प्रतिचे कपडे याआदिवासींना घालता यावे वसामाजिक आनंद साजरा करतायावा, या जाणिवेतून दिवाळी निमित्त एमएच २९ हेल्पिंग हँडच्या वतीने यवतमाळ करांना मेळघाट मधील नागरिकांना कपडे देण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यात मागीलदिड महिन्यापासून दहा हजारांवरकपडे संकलित झाले आहेत. या सर्वकपड्यांचे संकलन स्थानिकबाजोरीया नगरातील शाळेतकरण्यात आले होते. दिवाळीनिमित्तएमएच २९ हेल्पिंग हँडचे पदाधिकारीहे कपडे घेऊन मेळघाटकडे रवानाहोणार आहे. तिथे नवलगावगावामधील नागरिकांना हे कपडे व सोबत मिठाईचे वितरण वन विभागकर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनात करण्यात येणार आहे.

# अमरावतीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ११ प्रवेश निश्चित

## २४ ऑक्टोबर ही शेवटची तारीख

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा रुग्णालयात (जीएमसी) गेल्या तीन दिवसांत ११ विद्यार्थ्यांनी एमबीबीएसला प्रवेश घेतल्याचे अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले यांनी 'दिव्य मराठी'ला सांगितले. दरम्यान आजचा राऊंड तांत्रिक कारणामुळे रद्द करण्यात आला. उद्या, सोमवारपासून पुन्हा नियमित प्रक्रिया सुरु होणार असून २४ ऑक्टोबर हा प्रवेश निश्चित करण्याचा अंतीम दिवस आहे.



अमरावतीत यावर्षीपासून सुरु झालेल्या 'जीएमसी'त प्रवेशाचे हे पहिलेच वर्ष आहे. जिल्हा स्त्री रुग्णालय आणि सुपर स्पेशालिटीच्या इमारतीत हे महाविद्यालय व रुग्णालय सुरु होत आहे. दरम्यान आजपर्यंतचे सर्व राऊंड हे राष्ट्रीय पातळीवरील होते. त्यामुळे आजपर्यंत प्रवेश घेतलेले सर्व ११ विद्यार्थी परराज्यातील आहेत. यामध्ये राजस्थानचे आठ, दिल्लीचे दोन आणि मध्ये प्रदेशातील एका विद्यार्थ्याचा समावेश आहे. उद्या, सोमवारपासून महाराष्ट्रीयन विद्यार्थ्यांनाही प्रवेश घेता येणार आहेत.

स्थानिक नागरिकांची सततची मागणी आणि राज्य सरकारने त्याला अनुसरुन घेतलेले सकारात्मक धोरण यामुळे अमरावतीत यावर्षीपासून जीएमसी सुरु झाले आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरपर्यंत प्रवेश प्रक्रिया संपणार असून त्यानंतर प्रत्यक्ष वर्ग सुरु होतील, अशी माहिती आहे. अमरावती जिल्ह्यातही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असावे, यासाठी अमरावतीकरांनी गेल्या तीन वर्षांपूर्वी संघर्षात्मक पवित्रा घेतला होता. शेवटी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उघडण्याचा निर्णय राज्य सरकारला घ्यावा लागला. त्याचे दृश्य स्वरुप लवकरच पुढे येणार आहे.

**हे आहे तांत्रिक कारण**

एमबीबीएस प्रवेशाचा आजचा राऊंड थांबण्यामागे सांगितले जाणारे तांत्रिक कारण न्यायालयीन आहे. अनुसूचित जमाती (एसटी) संवर्गातील गोंड जातीच्या एका विद्यार्थीनीला पहिल्या राऊंडमध्ये ठाण्याच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला होता. परंतु त्या विद्यार्थीनीला अमरावती विभागात प्रवेश हवा असल्याने त्यांनी दुसऱ्या राऊंडची प्रतीक्षा केली. या राऊंडमध्ये त्यांना अकोला येथील जीएमसी अलॉट झाले. परंतु व्हॅलीडीटीचा मुद्दा आडवा आल्याने प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे त्या विद्यार्थीनीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाचे द्वार ठोठावले. त्यामुळे न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार आजचा राऊंड थांबविण्यात आला. दरम्यान अमरावतीच्या व्हॅलीडीटी कमीटीलाही न्यायालयाने त्या विद्यार्थीनीच्या प्रमाणपत्राबाबत विशिष्ट वेळेत निर्णय घेण्याचे आदेशित केले आहे.

# अमरावती, बडनेराची मतदारसंघांची मतमोजणी अमरावती शहरात होणार

## अन्य सहा मतदारसंघांची मतमोजणी स्थानिक ठिकाणीच

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबरला मतदान, तर २३ ला मतमोजणी होणार आहे. याकरिता प्रशासन सज्ज झाले असून, अमरावती मतदारसंघाची मतमोजणी विद्यापीठ मार्गावरील लोकशाही भवन येथे तर बडनेरा मतदारसंघाची मतमोजणी शिवाजी बीपीएड कॉलेज पंचवटी चौक येथे होणार आहे. याशिवाय अन्य सहा मतदारसंघाच्या मतमोजणीचे नियोजन स्थानिक ठिकाणीच करण्यात आले आहे.

राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता १५ ऑक्टोबरला लागू झाली. त्यामुळे जिल्ह्यात आठही मतदारसंघात सध्या प्रशासनाची सुविधांकरिता लगीनघाई सुरू झाली. मतदान ते मतमोजणीची देखील तयारी निवडणूक विभागाने केली आहे. जिल्ह्यात २ हजार ७०८ मतदान केंद्रांवर मतदान होईल. मतदान प्रक्रियेनंतर जेथे मतमोजणी होणार आहे, त्याच ठिकाणी स्ट्रॉंगरूम निर्माण केली आहे. २३ नोव्हेंबरला सकाळी ८ वाजतापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. अमरावती मतदारसंघाची मतमोजणी लोकशाही भवन येथे, तर बडनेरा मतदारसंघाची मतमोजणी शिवाजी बीपीएड कॉलेज पंचवटी येथे होईल. तिवसा मतदारसंघाची मतमोजणी तिवसा तहसीलमध्ये होणार आहे. धामणगाव मतदारसंघाची मतमोजणी चांदूर रेल्वे आयटीआय, मेळघाट मतदारसंघाची मतमोजणी नवीन प्रशासकीय भवन धारणी, अचलपूर कल्याण मंडपम परतवाडा, माशी मतदारसंघाची शासकीय धान्य गोडावून मोर्शी व दर्यापूर मतदारसंघाची मतमोजणी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे होणार आहे. याकरिता अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्तीही प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

# वाहनाला झेंडा लावताय, परवानगी घेतली का? जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश : जातीय मेळाव्यांना निर्बंध

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २१अमरावती**

विधानसभा निवडणूक निर्भय वातावरण व शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. यानुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या आदेशावरून जिल्हाधिकारी सौरभ कटीयर यांनी काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या. यात जातीय व धार्मिक मेळावे घेण्यास निर्बंध असून प्रचार वाहनास विविध राजकीय पक्षांचे झेंडे तसेच पोस्टर लावताना पूर्वपरवानगी घेणे




बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास आचारसंहिता भंग केल्याचा गुन्हा नोंद होऊ शकतो.

विधानसभा निवडणुकीसाठी १५ ऑक्टोबर रोजी आचारसंहिता लागू झाली. याची तातडीने अंमलबजावणी सुरू झाली आहे. शासकीय कार्यालयांवरील कोनशिला तसेच सार्वजनिक



ठिकाणांवरील पोस्टर्सबॅनर्स कापडाने झाकून घेण्यात आले आहेत. सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था व शासकीय विश्रामगृहाच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेण्यास मनाई करण्यात आली आहे.होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व भिंतीवर जाहिरात प्रदर्शित करताना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच परवानगी संपल्यानंतर ते हटविण्याचे आदेश आहेत. मालमत्तेची विद्रूपता करण्यास निर्बंध लावण्यात आले आहेत.

**मोर्चा, आंदोलनास मनाई**

जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध राहील.

**झेंड्याची उंची हवी २ फुटापर्यंतच**

फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विडोस्क्रीन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फूट उंचीपेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक वाहनचालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही.

# ५६वा पुण्यतिथी महोत्सव; राष्ट्रसंतांना लाखो गुरुदेवभक्तांकडून मौन श्रद्धांजली

## देश-विदेशातील भाविकांची उपस्थिती : गुरुकुंज आश्रमात लाखोचा जनसमुदाय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ गुरुकुंज मोझरी**

सोमवारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५६व्या पुण्यतिथी महोत्सवात देश-विदेशातून आलेल्या भाविकांनी ठीक ४ वाजून ५८ मिनिटांनी राष्ट्रसंतांना गुरुकुंज मोझरीत मौन श्रद्धांजली अर्पण केली. संपूर्ण भारतात अशाप्रकारे एखाद्या संत महात्म्याला इतक्या शिस्तबद्धरित्या लाखो भाविकांच्यावर उपस्थित राहिलेल्या भाविकांनी एकाचवेळी मौन श्रद्धांजली अर्पण करण्याचा हा देशातील एकमेव कार्यक्रम आहे.

दरवर्षी प्रमाणे यंदाही या महोत्सवामध्ये विविध प्रकारचे सामाजिक, धार्मिक, प्रबोधनात्मक, राज्यस्तरीय कीर्तन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा सर्व कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला. एक दिन सारा जगत गुरुदेव सेवामंडल की शिक्षा और दीक्षा पायेंगा।' या राष्ट्रसंतांच्या भाकितानुसार श्रद्धांजलीला अमेरिका, इंग्लंड, जॉर्जिया, जर्मनी, कॅनडा, दक्षिण ऑफ्रिका इत्यादी देशातील राष्ट्रसंत विचार प्रणालीचे अभ्यासक व परदेशी नागरिक आर्वजून उपस्थित होते.

गुरुदेव हमारा प्यारा या अर्चना गीताने सुरुवात करण्यातआली. यावेळी राष्ट्रसंतांच्या भव्यदिव्य विश्वव्यापक कार्याची माहिती शब्द सुरांच्या माध्यमातून लाखो जनसमुदायाला करुन दिल्या गेली. सुमारे दोन तास लाखोचा जनसमुदाय राष्ट्रसंतांच्या विश्वात्मक व कार्याचा त्यातून भासणार्या दिव्यत्वाचा अनुभव घेत ध्यानस्थ बसला होता. महाद्वारावरील विशाल घंटेचा निनाद होताच, ठिक ४ वाजून ५८ मिनिटांनी शिस्तबद्धरितीने लाखो गुरुदेव भक्तांनी राष्ट्रसंतांच्या महासमाधी



स्थळाच्या दिशेने हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. हा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी काही वेळासाठी राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक थांबविण्यात येऊन यात्रेतील दुकाने, भोंगे काही वेळाकरिता बंद करण्यात आल्यामुळे सर्वत्र निरव शांतता पसरली होती. निरव शांततेत अतिशय शिस्तबद्धतेने मौन श्रद्धांजलीचा भावपूर्ण सोहळा पार पडला. श्रद्धांजलीच्या कार्यक्रमानंतर चलाना भाई नाम गुरुका चलाना तसेच आरती राष्ट्रसंता ही आरती व सामुहिक प्रतिज्ञा करण्यात आली. तसेच यावेळी हिंदु, मुस्लिम, बौद्ध, जैन, ख्रिश्चन अशा सर्व धर्माच्या प्रार्थना त्यांच्या धर्मगुरुंकडून करण्यात आल्या.

श्रीगुरुदेव सेवामंडळाचे राज्यातील आजीवन, जीवन शाखा प्रमुख, सर्व प्रचारक, कार्यकर्ते, धार्मिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील गणमान्य व्यक्ती प्रामुख्याने उपस्थित होते. या श्रद्धांजलीच्या कार्यक्रमाचे नियोजन आध्यात्मिक विभाग प्रमुख डॉ. राजाराम बोथे यांनी केले.

तुकडोजी महाराजांनी संतांच्या विचारातील राष्ट्र निर्माणाची भावना, विश्वधर्माच्या प्रसाराचे कार्य आणि मानवतावादी प्रेरणेचा विचारप्रवाह आधुनिक काळामध्ये पुढे नेण्याचे कार्य केले. त्यांचे महाराष्ट्र आणि देशाच्या पुर्निर्माणासाठी फार मोठे योगदान आहे.

## विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२४ लेखी परीक्षेच्या पर्यायी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२४ लेखी परीक्षेच्या पर्यायी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून क्रीडा/सांस्कृतिक/अविष्कार/आव्हान/उत्कर्ष इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या व विद्यापीठाच्या संबंधित अधिका-यांनी प्रमाणित केलेल्या विद्यार्थ्यांच्या विद्यापीठीय पर्यायी परीक्षा दि. २२ जुलै, २०२४ पासून अमरावती, खामगांव, यवतमाळ व वाशिम या परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहेत.

अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती (केंद्र क्र. १२५), बुलडाणा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा जी.एस.महाविद्यालय,खामगांव (केंद्र क्र. ३०१), यवतमाळ जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ (केंद्र क्र.४१२), वाशिम जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा आर.ए. महाविद्यालय, वाशिम (केंद्र क्र.७०१), तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा त्यांच्या प्रवेशपत्रावरील केंद्रानुसार त्याच परीक्षा केंद्रांवर घेण्यात येईल.

विद्यार्थ्यांना देण्यात आलेले परीक्षा क्रमांक व प्रवेशपत्र पर्यायी परीक्षेकरीता कायम राहतील. तसेच वेळापत्रक व परीक्षा केंद्रानिहाय रोललिस्ट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. यासंदर्भात प्राचार्य, केंद्राधिकारी, सर्वसंबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून विद्यार्थ्यांना याची जाणीव करुन द्यावी, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी कळविले आहे. काही अडचण असल्यास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांचेशी ९८५००४२३५७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# लोकशाही यशस्वी करण्यामागे नागरिकांचा म्हणजे मतदारांचा मोलाचा सहभाग आहे : आ. सुलभाताई खोडके

## आशिर्वाद पदयात्रेत तपोवन परिसरातील नागरिकांचा लक्षवेधी सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्रात आगामी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे.अमरावती शहराचे भविष्य सुंदर करण्याची संधी घेत सकारात्मक विचार, निर्मळ मन यासोबतच नागरिकांच्या प्रश्नांचा गुंता सोडवण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक, प्रयत्नपूर्वक, जवाबदारीने,योग्यवेळी, योग्य ठिकाणी खबरदारी घेत अमरावती शहराला 'समृद्धी 'च्या मार्गावर अग्रेसर ठेवण्यासाठी आमदार-सौ.सुलभाताई संजय खोडके यांची सातत्यपूर्ण प्रयत्नांची पराकाष्ठा अविरतपणे सुरू आहे. समाज-सुसंस्कृत-विचारी-समजूतदार-संवेदनशील-समतावादी असतो.याची प्रचिती सोमवारी आमदार-सौ.सुलभाताई खोडके यांच्या आशिर्वाद पदयात्रेदरम्यान तपोवन परिसरात अनुभवयास मिळाली.सर्वप्रथम भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार



भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस त्यांनी वंदन व विनम्रतापूर्वक अभिवादन केल्यानंतर तपोवन परिसर स्थित आशीर्वाद यात्रेला सुरुवात झाली कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता व राजकिय अभिनिवेश न बाळगता आपल्या कारकिर्दीत आमदार-सौ.सुलभाताई खोडके यांनी जनसामान्यांना नागरी सेवा उपलब्ध करून देण्याचे काम असो योग्य ती उपाययोजना करणे तसेच लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणे यासंदर्भात प्रत्येकाला समान न्याय व समान संधी मिळाली पाहिजे.हे सूत्र वेळोवेळी अवलंबले. त्याचीच परिणीती म्हणून त्यांच्या आशीर्वाद पदयात्रेला नागरिकांचा लाभणारा प्रतिसाद व वाढता सहभाग लक्षात घेता ही बाब त्यांच्या कार्याला मजबुती देणारी ठरू पाहत आहे. अमरावती शहरातील नागरिकांना अपेक्षित विकासकामांची पूर्तता करतांना आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी भविष्याचा वेध घेत केलेले नियोजन करीत व प्रशासनासोबत समन्वय साधून श्रमिक असो वा मध्यमवर्गीय त्यांना शैक्षणिक व आरोग्यविषयक सोयीसुविधा मिळाल्या पाहिजे याकरिता सातत्याने भर दिला.यासोबतच शासकीय रुग्णांचा आरोग्य सुविधांचा दर्जा वाढावा या हेतूने वेळोवेळी शासनदरबारी प्रयत्नशील राहून त्याची पूर्तता होईस्तोवर त्या स्वस्थ बसल्या नाही.या पदयात्रेत महिलांच्या समस्या असो किंवा विद्यार्थ्यांचे,नोकरदारांचे, कामगारांचे प्रश्न आदी बाबी जाणून घेत प्राप्त निवेदनांचा स्वीकार करीत आमदार-सौ.सुलभाताई खोडके यांनी जनतेप्रति असलेली बांधिलकी जोपासत सर्वानाचं न्याय मिळवून देण्यासाठी आपली भूमिका व कटीबद्धता यावेळी व्यक्त केली. अमरावती शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता, आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी उदयोन्मुख युवक-युवतींना योग्य ते पाठबळ देऊन त्यांच्याकरिता विविधांगी उपक्रम राबविण्याला आपले सर्वतोपरी प्राधान्य दिले जाईल.असा विश्वास व्यक्त करीत विविध भागात गृहभेटी देताना त्यांनी जनसामान्यांशी संवाद साधताना २० नोव्हेंबर रोजी नागरिकांनी आपणास मतदान करीत लोकसेवेची संधी देण्याचे तपोवन परिसरातील विविध कॉलोनी-गृहनिर्माण संस्था, निवासी परिसर,सहनिवासी संकुल येथील स्थानिकांना विनंतीपूर्ण आवाहन केले.यासोबतच ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनींसह युवक-युवती व नवमतदारांनी मतदान करीत अमरावती शहराचे विकासकामांचे गतीचक्र अधिकाधिक गतीने कायम ठेवण्यासाठी मला मतदानरुपी पाठबळ दिल्यास जनतेचा विश्वास सार्थ ठरवीत आपण आपल्या क्षमतांचा पुर्णअंशाने विकास करीत अमरावती शहराला विकसनशील शहर म्हणून ओळख देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करू.अशी अपेक्षा व्यक्त करीत त्यांनी या कार्यात नागरिकांची सातत्याने लाभणारी भरभक्कम साथ व वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन यामुळेच आपली उमेदवारी ही सर्वसामान्य नागरिकांचे हित सरंक्षण व संवर्धन करण्यासाठी असल्याचे त्यांनी सांगितले. जागोजागी करण्यात येणाऱ्या स्वागताचा स्वीकार करीत आपल्या मायेचा ओलावा व जिव्हाळा हा यथावत कायमस्वरूपी लाभत असल्याने नागरिकांच्या आशिर्वादरुपी उर्जेतून आपण सर्वांचे हीत जोपासण्यासाठी अविरतपणे प्रयत्नरत राहू,असा मानस व्यक्त करीत आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी जनसंपर्क करतांना आपणास पुनःश्च नागरीसेवेची संधी देण्याचे स्थानिकांना विनंतीपूर्ण आवाहनही केले.या आशिर्वाद पदयात्रेत गंगोत्री कॉलोनी,संकेत कॉलोनी,आदित्य कॉलोनी,नागार्जुन कॉलोनी,मालूले-आऊट, न्यू साई कॉलोनी,शिव कॉलोनी,योगीराज नगर,लुंबिनी कॉलोनी,कृष्णा नगर,माधवी विहार,सुरक्षा कॉलोनी,रामानंद रेसिडेन्सी,अंबिका नगर,केशर कॉलोनी,नेताजी कॉलोनी,आशा कॉलोनी येथील ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनींसह युवक बांधव सहभागी झाले होते.

## उद्धव ठाकरेच मुख्यमंत्री व्हावेत.., आमदार यशोमती ठाकूर यांच्या वक्तव्याची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

अमरावती : महाविकास आघाडीत मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्यावरून वादाची ठिणगी काही दिवसांपुर्वी पडली. त्यानंतर स्वत: माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदावरून महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत. प्रथम सत्ताधारी महायुतीने आपला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करावा, त्यानंतर महाविकास आघाडी आपला चेहरा जाहीर करेल, असे स्पष्टीकरण दिले. तरीही मुख्यमंत्रीपदाची चर्चा सुरूच आहे. त्यातच आता काँग्रेसच्या आमदार यशोमती ठाकूर यांनी उद्धव ठाकरे हेच मुख्यमंत्री व्हावेत, असे विधान केल्याने त्याची चर्चा सुरू झाली आहे.




येथील संत ज्ञानेश्वर सभागृहात रविवारी रात्री महाविकास युवा आघाडीच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे, आमदार यशोमती ठाकूर तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या युवा आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री व्हावेत, हे आपले वैयक्तिक मत असल्याचे यशोमती ठाकूर यांनी सांगितले असले, तरी त्यांच्या वक्तव्याची चर्चा रंगली आहे.

## अमरावती पोलिसांतर्फे शहीद पोलीस स्मृती दिनाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख येथे चीनच्या सैनिकांसोबत लढताना केंद्रीय राखीव दलाच्या दहा जवानांनी प्राणांची आहुती दिली होती. तेव्हापासून २१ ऑक्टोबर हा पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात येतो.

पोलीस स्मृती दिनाच्या निमित्ताने आपले कर्तव्य पार पाडत असताना देशासाठी प्राण गमावलेल्या हुतात्म्यांना पोलीस स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र पोलीस





दलाच्या वतीने आदरांजली व्यक्त करण्यात येते

पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर यांच्या वतीने आज शहीद पोलीस स्मृती दिन च आयोजन आज सकाळी ८.०० वाजता पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी डॉ. निधि पाण्डेय विभागीय आयुक्त या उपस्थित होत्या.

देशाचे रक्षणाकरीता आपल्या प्राणाची आहुती देणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना आदरांजली वाहण्याकरीता शहीद पोलीस स्मृती दिन चे आयोजन करण्यात आले . या वेळी पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी सह पोलीस दलातील सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते या वेळी शहीद स्मारकाला तिरंग्याची आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती यावेळी पोलीस कर्मचाऱ्यांकडून हवेत तीन राउंड फायर करून मांवनदना देण्यात आली. यावेळी उपस्थित सर्वांनीपुष्पचक्र वाहत श्रद्धांजली वाहली.